

प्रश्न-भैरव
मेष
तूळ
वृषभ
वृश्चिक
मिथुन
धन
कर्क
मकर
सिंह
कुंभ
कन्या
मी

॥ श्री ॥

# प्रश्नभैरव.

## भाग १ ला

लेखकः—लक्ष्मण गोपाळ दीक्षित सातारकर

मुद्रक व प्रकाशक,

केशव रावजी गोंधळेकर

जगद्धितेच्छु प्रेस पुणें.

आवृत्ति ६ वी.

तारीख २० माहे जानेवारी सन १९११ इसवी.

सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें हें बुक रजिस्टर करवून यावर इतर भाषेंत भाषांतर करणें किंवा यांत फेरफार करणें इत्यादि सर्व प्रकारचे हक्क या ग्रंथाचे प्रकाशकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

किंमत ७ आणे, व टपाल हांशील १ आणा.

# प्रस्तावना.

भूतलस्थित लेखन-वाचन-ज्ञानसंपन्न लोकांस माझी अशी विनंति आहे कीं, मनुष्यमात्रास वैद्यशास्त्र व ज्योतिःशास्त्र ह्या दोहोंची नित्यशः अपेक्षा असते आणि ज्यांस संस्कृत भाषेचें परिज्ञान नसतें त्यांस मोठी अडचण पडते, व ग्रामजोशी वगैरे ज्योतिःशास्त्राभिज्ञ दैवज्ञास विचारावें लागतें, आणि तो सांगेल त्याप्रमाणें ऐकावें लागतें, अशा जगांतील चालू वहिवाटीस पाहून ही अडचण दूर करण्यासाठीं ज्योतिःशास्त्रप्रकरणीं प्रश्नविषयक आणि त्यांत सांगितल्याप्रमाणें बहुशः अनुभवही येतो अशा प्रश्नभैरव नामक ग्रंथाची कापालिकी या नांवाची नवीन टीका करून सुज्ञ जनानंदवृद्धीसाठीं हा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला आहे. ईश्वरानें कृपा केल्यास वाचक लोक ह्या ग्रंथांतील लेखनप्रमादादि किंवा तद्व्यतिरिक्त असे जे सर्व दोष असतील त्याविषयीं क्षमा करून जो ग्राह्यांश असेल त्याचाच स्वीकार करतील.

बहुधा सर्व लोकांत प्रश्न पाहण्याची चाल फार आहे, याकरितां दुर्मिळ असा हा ग्रंथ संपादन करून याचा उपयोग सर्वांस व्हावा म्हणून याजवर प्राकृत टीका केली आहे. हे श्रम केवळ हें पुस्तक साद्यंत वाचून पाहिल्यानेंच कळणार आहेत, व प्रश्न कसा पहावा हें ग्रंथारंभीं लिहिलेलें विवरण वाचून पाहिल्यानें समजेल. या ग्रंथापासून सर्वांस मोठा फायदा होईल असें जाणून केवळ लोकोपकारार्थ हें भाषांतर अभिज्ञ सुज्ञांच्या नेत्रांस पात्रीभूत असें केलें आहे.

ग्रंथकर्ता.

# अनुक्रमणिका.


| प्रश्न. | पृष्ठ |
|---|---|
| मंगलाचरण ........................ | १ |
| अथ नाडीज्ञानप्रश्न..................... | १ |
| साध्यस्य दिशापरत्वेन प्रश्नज्ञानं......... | २ |
| अथांगस्पर्शात् प्रश्न........................ | २ |
| मला कोणत्या दिशेस लाभ होईल......... | ३ |
| युद्धांत कोणत्या दिशेस घात झाला याविषयीं प्रश्न..................... | ६ |
| लाभाविषयीं निश्चय प्रश्न.................. | ६ |
| ऋण मिळेल किंवा काय अशाविषयीं.... | ६ |
| माझें कार्य केव्हां होईल अशाविषयीं.... | ६ |
| मी काम करितों आहें याविषयीं कसें.... | ७ |
| अक्षर प्रश्न................................. | ७ |
| अथ मुष्टिप्रश्न............................. | ७ |
| अथदृष्टिप्रश्न ............................. | ७ |
| अंकप्रश्न.................................... | ७ |
| चिंताप्रश्न .................................. | ८ |
| माझें जाणें केव्हां होईल अशाविषयीं प्रश्न............................ | ९ |
| अमुक मनुष्य केव्हां येईल अ. प्र..... | १० |
| चिंतिलेलें कार्य केव्हां होईल अशाविषयीं प्रश्न. ...................... | १० |
| किती दिवसांनीं प्रवासी मनुष्य घरीं येईल अशाविषयीं.............. | ११ |
| अथ पंथाप्रश्न ........................... | ११ |
| हरवलेले वस्तूविषयीं प्रश्न.............. | १२ |
| चोर कोणत्या स्थानीं आहे अ. वि..... | १३ |
| चोराची जाति वगैरेविषयीं प्रश्न......... | १३ |
| चोरी घरांत आहे किंवा काय अशाविषयीं प्रश्न........................ | १३ |
| चोरी कोणत्या दिशेस आहे अशाविषयीं प्रश्न......................... | १३ |

| प्रश्न. | पृष्ठ. |
|---|---|
| हाच प्रश्न अन्य प्रकारानें........... | १४ |
| हाच प्रश्न दुसऱ्या प्रकारानें........... | १४ |
| हाच प्रश्न नक्षत्रपरत्वें पाहणें........... | १४ |
| चोरी समजण्यासाठीं कृत्तिकादि अनुक्रमाचें चक्र........................ | १५ |
| चोरीविषयीं प्रश्न......................... | १५ |
| पडलेलें किंवा विसरलेलें द्रव्य मिळण्याविषयीं प्रश्न.................. | १५ |
| चोराची जाति समजण्याविषयीं........ | १६ |
| गेलेली नौका किंवा तारूं केव्हां येईल अशाविषयीं प्रश्न.............. | १६ |
| यजमान केव्हां कृपा करील अशाविषयीं प्रश्न.............................. | १६ |
| आम्हास आश्रय केव्हां मिळेल अशाविषयीं प्रश्न.................. | १७ |
| मला अधिकार केव्हां मिळेल अशाविषयीं प्रश्न.................. | १७ |
| मला फार मोठा अधिकार केव्हां मिळेल अशाविषयीं.................... | १७ |
| मिळालेला अधिकार स्थिर आहे किंवा चंचळ आहे अशाविषयीं........ | १८ |
| गेलेलें राज्य केव्हां मिळेल अशाविषयीं प्रश्न.............................. | १८ |
| झालेलें भय दुःख देईल किंवा काय अशाविषयीं प्रश्न.................. | १८ |
| आजारी मनुष्य बरा होईल किंवा मरेल अशाविषयीं.................... | १८ |
| कोणे एका राजाचा किंवा मनुष्याचा बहुत दिवस शोध नाहीं, तो जिवंत आहे किंवा मेला अ. प्र............... | १९ |
| मजविषयीं उठलेली दुष्ट वार्ता खरी आहे | |

| प्रश्न. | पृष्ठ. |
|---|---|
| किंवा खोटी अशावि. | १९ |
| पत्राचें उत्तर केव्हां येईल अ. वि. | १९ |
| पत्र घेऊन येणारा मनुष्य केव्हां येईल अशाविषयीं प्रश्न | १९ |
| बंदींत आहे तो केव्हां मुक्त होईल अशाविषयीं प्रश्न | २० |
| सनद मिळाली परंतु तिजवर राजमुद्रा कधीं होईल अशावि० प्रश्न | २० |
| वादीचा जय होईल किंवा काय अशाविषयीं प्रश्न | २१ |
| युद्ध होईल किंवा काय अ. वि. प्रश्न | २१ |
| युद्धांत जय होईल किंवा पराजय होईल अशाविषयीं प्रश्न | २१ |
| युद्ध सुरू आहे यांत किती माणसें मरतील अशाविषयीं प्रश्न | २१ |
| या वेळेस नारद कोठें आहे अशाविषयीं प्रश्न | २१ |
| या वेळेस चंद्र कोठें आहे अ. वि. प्र. | २२ |
| या वेळेस चंद्र काय करितो आहे अशाविषयीं प्रश्न | २२ |
| चंद्राची उन्नति कशी आहे अशाविषयीं प्रश्न | २३ |
| चंद्राचा रंग कसा आहे अशाविषयीं | २३ |
| गुप्तपणानें हनन करण्याविषयीं प्रश्न | २३ |
| अमुक खटल्याचा सल्ला करीत आहें, हा होईल किंवा नाहीं अ. वि. | २४ |
| अमुक किल्ला घ्यावयाचा आहे त्याचा भंग होईल कीं काय अ. वि. | २४ |
| कोट किंवा गांव याजवर वेढा पडला असेल किंवा नाहीं अ. वि. | २५ |
| वेढिलेल्या कोटाचा भंग होईल कीं काय अशाविषयीं प्रश्न | २५ |
| किती दिवसांनीं दुर्गभंग होईल अशाविषयीं प्रश्न | २६ |
| आजाऱ्याविषयीं प्रश्न | २६ |

| प्रश्न. | पृष्ठ. |
|---|---|
| वैद्याविषयीं प्रश्न | २७ |
| मला सौख्य केव्हां होईल अ. वि. | २७ |
| या गांवांत मी जातों परंतु मला फल होईल कीं काय अशावि. प्रश्न | २७ |
| तीर्थयात्रेविषयीं | २७ |
| या वेळीं गुरुपाशीं विद्यारंभ करावा कीं काय याविषयीं प्रश्न | २८ |
| नारदानें बाधा पाहण्यास सांगितल्याप्रमाणें बाधेविषयीं प्रश्न | २८ |
| व्रत घेण्याविषयीं प्रश्न | २८ |
| अमुक स्त्रीशीं विवाह होईल किंवा नाहीं अशाविषयीं प्रश्न | २८ |
| पुत्राविषयीं प्रश्न | २९ |
| स्त्री गर्भिणी आहे किंवा काय अशाविषयीं प्रश्न | २९ |
| स्त्री गर्भिणी आहे परंतु गर्भांत पुत्र किंवा कन्या आहे अशावि. प्र. | २९ |
| गर्भास किती महिने झाले अ. वि. | २९ |
| गर्भिणी कधीं प्रसूत होईल अ. वि. | २९ |
| देण्याघेण्याचे दुकानाविषयीं प्रश्न | ३० |
| राजदर्शनाविषयीं प्रश्न | ३० |
| दुर्भिक्षाविषयीं प्रश्न | ३० |
| सुभिक्षाविषयीं प्रश्न | ३० |
| मुष्टीविषयीं प्रश्न | ३० |
| नष्टवस्तुविषयीं प्रश्न | ३१ |
| धातुज्ञानाविषयीं प्रश्न | ३१ |
| वर्ण म्हणजे रंगाविषयीं प्रश्न | ३१ |
| शिकारीविषयीं प्रश्न | ३२ |
| शिकारीस गेलों असतां किती श्वापदें मिळतील अशाविषयीं प्रश्न | ३२ |
| राशींचे बलज्ञानाविषयीं प्रश्न | ३२ |
| बलाढ्य ग्रह कोणते हें ज्ञान होण्याविषयीं प्रश्न | ३३ |
| क्षणिबल ग्रह कोणते हें समजण्याविषयीं प्रश्न | ३३ |


| प्रश्न. | पृष्ठ | प्रश्न. | पृष्ठ |
|---|---|---|---|
| आतां अन्य ग्रंथमतांचें यात्रागत शुभाशुभ प्रश्नज्ञान समजण्याविषयीं विचार.......................... | ३३ | दिवसा व रात्रीं कोण बलाढ्य व कोण किती दोष नाश करितो हें समजण्याविषयीं प्रश्न ........... | ३४ |
| केंद्रादिराशींचे ज्ञानाविषयीं प्रश्न........... | ३४ | —— | |


पूर्वी तात्कालिक लग्न कसें आणावें हें समजलें पाहिजे म्हणून येथें सिद्धांतोक्त लग्नसाधन न सांगतां सामान्यपक्षींच सांगतों आणि ज्यांस अत्यंत सूक्ष्मच लग्नसाधन पाहिजे असेल, त्यांणीं ग्रहलाघव नामक ज्योतिषप्रकरणीं ग्रंथ प्राकृत झाला आहे त्यावरून पहावें.

प्रस्तुत स्थूलमानानें लग्नसाधन करणें झाल्यास ज्या महिन्यांत ज्या दिवशीं ज्या वेळेस लग्नसाधन करणें आहे, त्या महिन्यांत कोणती संक्रांत झाली असून इष्ट दिवस ज्या मेषादि संक्रांतींत येईल तें लग्न त्या दिवसाच्या आरंभीं धरावें, आणि ती संक्रांति लागून जितके दिवस झाले असतील तितके मोजावे आणि त्या लग्नाच्या जितक्या घटिका असतील तितक्यांचीं पळें करावीं व त्यांस संक्रांतीचे तीस दिवसांनीं भागून जितकीं पळें लब्ध येतील तितकींच पळें प्रत्येक दिवसास, याप्रमाणें संक्रांतीच्या भुक्त दिवसांचीं पळें एकंदर करून त्यांच्या घटिका कराव्या आणि त्या घटिका, जें प्रथम लग्न धरावयाचें त्यांत वजा कराव्या. नंतर बाकी उरतील त्या घटिकांत प्रत्येक लग्नांच्या घटिका, प्रश्न केलेल्या घटिका भरते तेथपर्यंत मिळवून ज्या लग्नाच्या घटिकांनीं इष्टकालची भरती झाली असेल तेंच त्या इष्टकालाचें लग्न समजावें. हें लग्न भागात्मक उत्पन्न होणार नाहीं. केवळ अमुक लग्न आहे इतकें मात्र समजेल.

प्रश्नकालीं अमुक लग्न आहे असें समजल्यानंतर एक द्वादश घरांचें चक्र काढून त्यांत इष्टकालचें लग्न आरंभीं मांडावें. आणि नंतर त्या लग्नापासून डाव्या अंगाच्या क्रमानें द्वादश राशी मांडाव्या, आणि त्या वेळेस सूर्यादि ग्रह ज्या ज्या राशींस असतील, त्या त्या राशींस ते मांडावे आणि त्यावरून फलें सांगावीं. अशीं फलें ज्या कुंडलीवरून सांगतात, त्या कुंडलीस तात्कालिकप्रश्न–लग्नकुंडली असें नांव जोशी लोकांत प्रसिद्ध आहे.

तात्कालिक प्रश्नलग्न कुंडली.




| मेषादिद्वादशलग्नघटिका. | | | |
|---|---|---|---|
| मेष | ४ | तूळ | ५॥ |
| वृषभ | ४॥ | वृश्चिक | ५॥ |
| मिथुन | ५ | धन | ५॥ |
| कर्क | ५॥ | मकर | ५ |
| सिंह | ५॥ | कुंभ | ४॥ |
| कन्या | ५॥ | मीन | ४ |

| मेषादिद्वादशराशींचे स्वामी. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मेष | वृषभ | मिथुन | कर्क | सिंह | कन्या |
| मंगळ | शुक्र | बुध | चंद्र | रवि | बुध |
| तूळ | वृश्चिक | धन | मकर | कुंभ | मीन |
| शुक्र | मंगळ | गुरु | शनि | शनि | गुरु |

## वर लिहिलेला मजकूर समजण्याकरितां उदाहरण

प्रश्न शके १७८८ क्षयनाम संवत्सरे पौष शुद्ध ६ शनिवारीं घटी १ पळें २९ नंतर सप्तमी घटी ५९ पळें ३४ उत्तराभाद्रपदा नक्षत्र घटी २२ पळें ५८ नंतर रेवती, परिघयोग घटी १० पळें ४४ नंतर शिवयोग वर्तमानकालीं गरज करण आहे. या दिवशीं सूर्यास्त होण्यापूर्वीं पळें ४० या वेळेस कोणतें लग्न आहे तें स्थूलमानानें करून पाहणें आहे.

उत्तर—या दिवशीं सदर्हू वेळेसच मकरसंक्रांति होत आहे, तेव्हां त्या दिवशीं मकरादि लग्नापासून अस्तमानीं उदयापासून ७ वें लग्न असावयाचें या नियमानें मकरापासून सातवें लग्न कर्क तें आजच सूर्यास्तापूर्वीं अकरा पळें लागणार; तथापि इष्टकाल सूर्यास्तापूर्वीं पळें ४० हा आहे; म्हणून अत्यंत स्पष्टपणें धनलग्नच इष्टकालीं येतें. आतां त्या आलेल्या धनलग्नापासून द्वादश राश्यात्मक कुंडली कशी मांडावी, हें पूर्वींच तन्वादि द्वादश भावांचीं नांवें स्पष्ट समजण्याजोगी मात्र कुंडली दाखविली आहे; परंतु हींत लग्नें व ग्रह दाखविले आहेत.




आतां वर लिहिलेल्या कुंडलींत धनलग्न इष्टकालीं आलें, म्हणून तें प्रथम गृहांत मांडेल आणि त्यापासून बाकी लग्नें डाव्या बाजूच्या क्रमानें अकरा घरांत अकरा मांडिलीं. नंतर नवग्रह मांडावयाचे ते रवीपासून अनुक्रमानें पाहतां रवि नुक्ताच मकर राशीस गेला म्हणून तो मकरास धनभावीं लिहिला; चंद्र मीनांत आहे म्हणून तो चतुर्थभावीं लिहिला; मंगळ वक्री होऊन मिथुनास येणार आहे म्हणून कर्कास मांडिला, बुध धनासच आहे म्हणून तो लग्नीं लिहिला; गुरु मकरास आहे म्हणून धनभावीं लिहिला; शुक्र वृश्चिकास आहे म्हणून व्ययभावीं आणि शनीही वृश्चिकासच आला आहे म्हणून तोही व्ययभावींच लिहिला. याप्रमाणें स्थूलमानानें पूर्वीं इष्टकालीं म्हणजे प्रश्नकालीं कोणतें लग्न आहे याचा विचार करून तें आणून प्रस्तुत लिहिल्याप्रमाणें नवग्रहही पाहून द्वादशभाव व ज्या राशीस जो ग्रह असेल तो त्या

भावीं याप्रमाणें लिहून एक कुंडली तयार करावी आणि प्रश्नकारानें कोणत्या प्रकरणांतील प्रश्न केला आहे त्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें गणित अथवा ग्रहस्थिति किंवा ग्रहांच्या परस्पर दृष्टि अथवा दुसरे कांहीं योग वगैरे जें सांगितलें असेल तें या कुंडलीवरून पाहून शुभाशुभ फल सांगावें.

आतां या ग्रंथाच्या अथवा इतर ज्योतिःशास्त्र विचाराच्या उपयोगीं पडण्याजोगें चर, स्थिर, द्विस्वभाव, क्रूर, सौम्य, नर, स्त्री, विषम, सम इत्यादि राशी कोणत्या कशा आहेत, हें समजण्यासाठीं एक कोष्टक लिहितों; या कोष्टकांतलि पहिल्या पट्टींत बारा राशींची नांवें लिहिलीं आहेत; दुसरींत चर, स्थिर, द्विस्वभावादि लग्नें कोणतीं, तीं लिहिलीं आहेत; तिसरींत क्रूर, सौम्यलग्नें लिहिलीं आहेत; चवथींत नर-स्त्री संज्ञक राशी लिहिल्या आहेत; पांचवींत विषम सम राशि लिहिल्या आहेत आणि सहावींत चंद्राच्या राशीपरत्वें दिशा लिहिल्या आहेत.

| मेष १ | वृषभ २ | मिथुन ३ | कर्क ४ | सिंह ५ | कन्या ६ | तूळ ७ | वृश्चिक ८ | धन ९ | मकर १० | कुंभ ११ | मीन १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चर | स्थिर | द्विस्व | चर | स्थिर | द्विस्व | चर | स्थिर | द्विस्व | चर | स्थिर | द्विस्वभा. |
| क्रूर | सौम्य | क्रूर | सौम्य | क्रूर | सौम्य | क्रूर | सौम्य | क्रूर | सौम्य | क्रूर | सौम्य |
| नर | स्त्री | नर | स्त्री | नर | स्त्री | नर | स्त्री | नर | स्त्री | नर | स्त्री |
| विषम | सम | विषम | सम | विषम | सम | विषम | सम | विषम | सम | विषम | सम |
| प्राची | दक्षिण | पश्चिम | उत्तर | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |

## ग्रहांचें मित्रामित्रचक्र.

| | र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मित्र | चं. मं. | र. बु. | र.चं. गु. | र. शु. | र.मं. चं. | श. बु. | शु. बु. |
| सम | बु. गु. | मं. गु. शु. श. | शु. श. | मं. गु. श. | श. | गु. मं. | गुरु. |
| शत्रु | श. शु. | ० | बुध. | चं. | शु. बु. | र. चं. | मं. र. चं. |

## ग्रहांच्या दृष्टि.

| | र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ चरण | ३ १० | ३ १० | ३ १० | ३ १० | ३ १० | ३ १० | ३ १० |
| २ चरण | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ | ९ |
| ३ चरण | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| ४ चरण | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| पूर्णदृष्टि | ७ | ७ | ८ ४ | ७ | ५ ९ | ७ | ३ १० |

॥ श्री ॥

# श्रीगुरुभ्यो नमः

## मंगलाचरण.

### श्लोक

चंदूनिसिंधुरमुखांघ्रिरघूत्तमाचीं । पादांबुजें स्मरुनि नाशकजींभ्रमाचीं ॥ चित्तींधरूनिनगजापतिरम्य पाय । हें प्रश्नशास्त्र कळण्या लिहितों उपाय ॥ १ ॥

याप्रमाणें निर्विघ्नपणें प्रारब्धकार्य परिसमाप्त्यर्थ इष्टदेवतानमनरूप मंगलाचरण करून प्रश्नभैरव नामक ज्योतिःशास्त्रांतर्गत ग्रंथाचें भाषांतर लिहिण्यास आरंभ करितों.

आतां सामान्यपक्षीं प्रश्न पाहणारा व पाहविणारा हे परस्परें कसे असावे वगैरे प्रकार लिहूं लागलों तर ग्रंथविस्तार होईल, यास्तव तो विषय टाकून दिला तरीही जेवढा येथें अवश्यच आहे तेवढा लिहितों.

जोशास प्रश्न करतेवेळीं रिक्तहस्तानें ह्मणजे त्याजपुढें कांहीं फल, पुष्प, दक्षिणा वगैरे ठेविल्यावांचून प्रश्न करूं नये. प्रश्न करणाराचें चित्त शांत असावें; त्यानें प्रश्न करण्यापूर्वी एक या शब्दाचा उच्चार प्रश्नसंबंधी बोलण्यांत आणूं नये. प्रश्न करणारानें संशयित प्रश्न करूं नये.

जोशानें विचारपूर्वक जो प्रश्न केला असेल त्यास साधकबाधक ग्रहांच्या बलाबलांचा अथवा प्रकरणपठित, ह्मणजे ज्या प्रश्नाचें फल पाहाणें असेल तो प्रश्न या पुस्तकांतील अनुक्रमणिकेप्रमाणें पाहून त्याविषयीं जो विचार सांगितला असेल तो करून, त्याप्रमाणें फल सांगावें.

### अथ नाडीज्ञानप्रश्न श्लोक.

नाडीतुवामाहिमदीधितिः स्यात्स्याद्भास्करोदक्षिणनाडिकाच ॥ चंद्रस्यनाड्यामथवार्कनाड्यामंतः समीरः प्रविशत्यवश्यं ॥ १ ॥

**अर्थ.**—जोशानें आपल्या दोन्ही नाकपुड्यांवर हलकाच हात ठेवून विचार करावा कीं, या वेळेस डाव्या नाकपुडींतून किंवा उजव्या नाकपुडींतून वायु अधिक येतो. जर डाव्या नाकपुडींतून वारा अधिक आला तर; तिला चंद्रनाडी असें म्हणावें आणि जर उजव्या नाकपुडींतून वारा अधिक येईल तर, तिला सूर्यनाडी असें म्हणावें. आतां चंद्र किंवा सूर्य यांच्या नाड्यांतून उलटाही वायु अवश्यपणें नाकांत जातो. त्याविषयीं प्रश्न पाहणारानें सूक्ष्म विचार मात्र केला पाहिजे, आणि सूक्ष्म विचार करून उत्तर सांगावें.

यशःसमृद्धिंकुशलंजयश्चनिर्यच्छतिस्यात्समवैपरीत्यं ॥
चंद्रस्यनाडीवहतेयदीत्थंतन्नोरवेःस्यात्प्रविशत्यवश्यं ॥ २ ॥

**अर्थ.**—यश, समृद्धि, कुशलत्व, जय हीं फलें सम आणि विषम या भेदानें समजावीं. उदाहरण.— समयश, विषमसमृद्धि, समकुशलत्व, विषमजय, अशींच जीं चंद्राच्या नाडींत फलें आहेत तीं सूर्याच्या नाडींत नाहींत. आतां एकादे वेळेस स्वराचा निश्चय लवकर होत नाहीं, याचें कारण प्रकृतींत कफवातादि दोष आहेत त्यांचे योगानें वायु कमी जास्त होतो; तसा ज्याचा वारंवार होतो त्यानें बहुधा स्वरप्रश्न पाहूं नये. कारण अनुभव येत नाहीं.

साध्यस्यदिक्परत्वेनप्रश्नज्ञानम्.

पूर्वस्यांपश्चिमायांयदिवदतिनरःप्राश्निकःसिद्धकार्योया-
म्यांसौम्येप्सितः सन्यदिवदतिनरः प्रस्थितंदूरतः स्यात् ॥
नैर्ऋत्यांरौद्रदेशेयदिवदतितदादूरतश्चार्थमार्गोवायोरग्नेश्चन-
स्यादिशिवदतितदासिद्धिराराद्विनष्टा ॥ ३ ॥

**अर्थ.**—जोशानें, जो प्रश्न करणारा असेल, त्यास तुझें कार्य कोणत्या दिशेकडून होणार आहे असें पूर्वीं विचारावें. नंतर त्यानें सांगितल्याप्रमाणें दिशेवरून फल सांगावें. जर पूर्व आणि पश्चिम या दिशांकडे कार्य आहे तर त्याचें कार्य सिद्ध होईल. दक्षिण आणि उत्तर या दिशांस कार्य असेल तर तें कार्य दूर जाईल. नैर्ऋत्य आणि ईशान्य या दिशांस असेल, तर द्रव्य मिळणार नाहीं, आणि वायवी व आग्नेयी ह्या दिशांस कार्य असेल, तर तें कार्य सिद्ध होणार नाहीं.

अथांगस्पर्शात्प्रश्नज्ञानम्.

शिरोमुखंकर्णनेत्रेस्पृष्ट्वापृच्छातियोनरः ॥
सुवर्णधनधान्यानांलाभस्तस्यभवेद्ध्रुवम् ॥ ४ ॥

**अर्थ.**—जोशानें प्रश्न करणारास आपल्या अंगास स्पर्श करावयास सांगावें. नंतर तो प्रश्नकर्ता ज्या अंगास स्पर्श करील त्याप्रमाणें फलें पाहून सांगावीं. जर प्रश्नकर्ता शिर, मुख व नेत्र यांस स्पर्श करील तर त्यास सोनें, धन, धान्य हीं फलें अनुक्रमानें निश्चयानें प्राप्त होतील.

स्कंधग्रीवाहनौकंठेतस्यलाभोहियत्नतः ॥
कुक्षौनाभौकरेचैवक्लेशात्कार्यंहिसिद्ध्यति ॥ ५ ॥

**अर्थ.**—जर खांदे, ग्रीवा म्हणजे गळ्याजवळ घांटी असते ती आणि गालावरील भाग यांस स्पर्श केला तर त्याचें कार्य मेहनतीनें सिद्ध होईल. कांख, नाभी, हात यांस स्पर्श केला असतां क्लेशानें कार्य होईल.

केशस्पर्शेभवेद्दुःखंकर्णादिस्पर्शनेसुखम् ॥
तृणांगारकसंस्पर्शात्कार्यसिद्धिर्नजायते ॥ ६ ॥

**अर्थ.**—केशांस स्पर्श करील तर त्यास दुःख प्राप्त होईल आणि कानांस स्पर्श करील तर सुख होईल. गवत आणि अग्नि यांस स्पर्श केला तर कार्यसिद्धि होणार नाहीं.

काष्ठपंकतृणस्पर्शेकार्यसिद्धिर्हिदूरतः ॥

वस्त्रालंकारसंस्पर्शेकार्यसिद्धिःपदेपदे ॥ ७ ॥

अर्थ.—लांकडें, गवत, निखल यांस स्पर्श करील तर कार्यसिद्धि दूर गेली असें समजावें आणि वस्त्रें, अलंकार यांस स्पर्श केल्यास त्याचीं कार्यें पावलोंपावलीं होतील.

देवालयेनदीतीरेदिव्यस्थानेशुभंभवेत् ॥
सुखंदिक्षुस्थितेसिद्धिर्विदिक्षुतुनजायते ॥ ८ ॥

अर्थ.—प्रश्न करणारानें देवालय, नदीतीर किंवा रमणीय जागा या स्थलांवर प्रश्न केला तर त्याचें कल्याण होईल. जर दिशांकडे म्हणजे पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या दिशांकडे बसून प्रश्न केला तर त्यास सुख होईल, आणि विदिशा म्हणजे आग्नेयी, नैर्ऋति, वायवी व ईशानी या दिशांकडे बसून प्रश्न केला तर त्याचें कार्य होणार नाहीं.

अथ लाभप्रश्न.

शीतांशुवित्तेश्वरलग्ननाथाःपरस्परंसंयुतवीक्षिताश्चेत् ॥
धनत्रिकोणोदयगायदास्युस्तदार्थलाभंप्रवदेन्नराणां ॥ ९ ॥

अर्थ.—जोशानें तात्कालिक लग्नकुंडली सांगितल्याप्रमाणें मांडून तिच्यांत जर चंद्र, धनेश आणि लग्नेश हे एकमेकांशीं युक्त अथवा दृष्ट असतील, किंवा धनस्थान अथवा नवम स्थान किंवा लग्न या स्थानीं पूर्वोक्त ग्रह असतील तर जो प्रश्न करतो त्यास द्रव्यलाभ होईल.

एकोऽपिहियदायोगःशीघ्रंलाभस्तुनिश्चितम् ॥
चंद्रयोगेविशेषेणलाभःस्वामिस्वरूपतः ॥ १० ॥

अर्थ.—जर प्रश्नलग्नांत सांगितल्याप्रमाणें एकही योग जरि साधला तरि निश्चयानें लाभ होईल, आणि तोच योग जर चंद्रामुळें झाला असला तर त्याच्या यजमानापासून त्याला मोठा लाभ होईल.

लग्नलाभपयोर्दृष्टिर्लाभेलाभकरीमता ॥
लाभःसर्वखगैर्दृष्टोलाभःपूर्णोभवेत्तदा ॥ ११ ॥

अर्थ.—जर लग्नेश्वर आणि लाभेश यांची लाभस्थानावर दृष्टि असेल, तर लाभ होईल, आणि जर सर्व ग्रहांनीं लाभभाव पाहिला असेल तर प्रश्नकर्त्यास पूर्णलाभ होईल.

लाभेलाभेशसंदृष्टेलाभेशुक्रेगुरौविधौ ॥
लाभोभवतिभाग्येवाधनेवाचंद्रयोगतः ॥ १२ ॥

अर्थ.—जर लाभभाव लाभेशानें पाहिला असेल, अथवा लाभभावीं शुक्र, बृहस्पति किंवा चंद्र हे ग्रह असतील, अथवा धनस्थानीं किंवा भाग्यस्थानीं चंद्र असेल तर, त्याच्या कार्यापासून त्याला लाभ होईल.

लग्नगोयदिधर्मेशोदृष्टोलग्नाधिपेनच ॥
नृपाल्लाभस्तदावाच्यश्चंद्रदृष्ट्याविशेषतः ॥ १३ ॥

अर्थ.—जर धर्मभावाचा अधिपति म्हणजे नवमेश लग्नीं असेल अथवा लग्नेश्वराची नव-

मेशावर दृष्टि असेल, तर राजापासून प्रश्नकर्त्यास लाभ होईल, आणि नवमेश्वरावर अथवा लग्नेश्वरावर किंवा लग्नीं चंद्राची दृष्टि असेल तर तोच लाभ विशेषकरून होईल.

धनेधनपतिर्लग्नेवित्तपोधनलाभकृत् ॥
धनेशुक्रेंदुगुरवोवित्तपोधनलाभदः ॥ १४ ॥

**अर्थ.**—धनस्थानीं धनभावाचा स्वामी अथवा तोच धनेश लग्नीं असेल तर धनलाभ होईल. जर धनस्थानीं शुक्र, चंद्र, बृहस्पति आणि धनस्थानाचा स्वामी इतके ग्रह असतील तर प्रश्नकर्त्यास धनलाभ होईल.

वित्तेयदालग्नपतिश्चलग्नेवित्ताधिपश्चंद्रमसायुतश्च ॥
प्रष्टुर्हिलाभःशशिलाभलग्नाधिपानिरीक्षंतिपरस्परंवा ॥ १५ ॥

**अर्थ.**—जर धनभावीं लग्नेश्वर असून धनेश्वर चंद्राशीं युक्त असा लग्नीं आहे आणि चंद्राधिष्ठित राशीचा स्वामी लाभेश व लग्नेश हे परस्परांस पहातील तर प्रश्नकर्त्यास विशेष द्रव्यलाभ होईल. आणि दृष्टि असून पूर्वोक्त योगच असेल तर सामान्य लाभ होईल.

चरेलग्नेचरेचंद्रेतदीशेचरराशिगे ॥
लग्नेचेदुभयोर्दृष्टिःकार्यंशीघ्रंतदाभवेत् ॥ १६ ॥

**अर्थ.**—प्रश्न ज्या वेळेस केला त्या वेळचें लग्न चर असून चंद्र व लग्नेश चरराशींस असतील अथवा लग्नावर त्या उभयतांची दृष्टि असेल तर प्रश्नकर्त्याचें कार्य सत्वर होईल.

स्थिरलग्नेस्थिरेचंद्रेतदीशास्थिरराशिगे ॥
पूर्णादृष्टिर्द्वयोर्लग्नेस्थिरंकार्यंतदाभवेत् ॥ १७ ॥

**अर्थ.**—प्रश्नलग्न जर स्थिर आहे आणि चंद्र व लग्नेश हेही स्थिर राशीस असून हे उभयतां पूर्ण दृष्टीनें प्रश्नलग्न पहातील तर तें कार्य स्थिर आहे; लवकर होणार नाहीं.

द्विस्वभावेयदालग्नेद्विस्वभावेचचंद्रमाः ॥
लग्नेशेद्विशरीरस्थेतदाकार्यंविलंबतः ॥ १८ ॥

**अर्थ.**—लग्न द्विस्वभाव असून चंद्रही द्विस्वभावराशीसच आहे, आणि लग्नेशही द्विस्वभाव राशीसच असेल तर प्रश्नकर्त्याचें कार्य अवकाशानें होईल; सत्वर होणार नाहीं.

चरलग्नेचरांशेवाचलग्नंतुपश्यति ॥
लग्नेशोद्वित्रिरात्रंवाकार्यावधिरिहोच्यते ॥ १९ ॥

**अर्थ.**—प्रश्नलग्न चर असून एका लग्नांत नऊ नवांश होतात, त्याप्रमाणें प्रश्नकालीं जो नवांश असेल तोही चरच असेल आणि लग्नेश चरलग्नास पहात असेल तर प्रश्नकर्त्याचें कार्य दोन तीन दिसांनीं सिद्ध होईल असें सांगावें.

स्थिरेतुद्विगुणंमानंसाधंतुद्विशरीरके ॥
तत्रवक्रेहिखेटेचत्रिगुणंमानमुच्यते ॥ २० ॥

**अर्थ.**—जर स्थिरलग्न प्रश्नकालीं येईल तर ज्या कालीं कार्य होणार आहे त्याच्या

दुप्पट अवकाश तेंच कार्य होण्यास लागेल; आणि तेंच लग्न द्विस्वभाव असलें असतां अडीचपट अवकाश लागेल; आणि जर त्या प्रश्नकालीं कोणी ग्रह वक्र वगैरे असले तर त्या कार्यास तिप्पट अवकाश लागेल.

केंद्रत्रिकोणगाःसौम्याःपापाउपचयस्थिताः ॥

लग्नेश्वरोऽष्टमेलाभेव्ययेकार्यंसुनिश्चितम् ॥ २१ ॥

**अर्थ.**—केंद्र म्हणजे चतुर्थ, सप्तम, दशम व पंचम लग्न आणि नवम या स्थानीं प्रश्नकालीं शुभग्रह असून उपचयभवन म्हणजे तृतीय, षष्ठ, दशम, एकादश, चतुर्थ, अष्टम या स्थानीं पापग्रह असतील आणि लग्नेश्वर अष्टम, लाभ, व्यय या स्थानीं असेल तर प्रश्नकर्त्याचें कार्य निश्चयानें होईलच असें सांगावें.

व्यत्ययेकार्यहानिश्चमिश्रेमिश्रफलंभवेत् ॥

मित्रेपूर्णंभवेत्कार्यंशत्रौहानिःसमेसमम् ॥ २२ ॥

**अर्थ.**—पूर्वीं कार्याविषयीं जे योग सांगितले ते बरोबर साधले तर कार्य होईलच, न साधले तर होणार नाहीं. मिश्रयोग आले तर कार्यही मिश्रफलच होईल. सांगितलेल्या योगांत प्रश्नकालीं जर ग्रह परस्परें मित्र असतील तर कार्य पूर्ण होईल. ते ग्रह जर शत्रु असतील तर हानि होईल, आणि सम असतील तर सम होईल.

द्विधाप्रश्नःसमाख्यातःशिवशक्त्यात्मकःसदा ॥

शिवशक्त्यात्मकंप्रश्नंयोजानातिसदैववित् ॥ २३ ॥

**अर्थ.**—कोणताही प्रश्न दोन प्रकारांनीं पहावयास सांगितला आहे. त्या प्रकारांपैकीं पहिल्याचें नांव शिव आणि दुसऱ्याचें नांव शक्ति असे दोन भेद आहेत. शिवशब्दानें लग्नग्रह इत्यादि प्रश्नसाधन आणि शक्तिशब्दानें त्याच्या बलाबलाचा विचार करणें हेंच होय. तर जो जोशी शिवशक्त्यात्मक प्रश्न समजेल त्यासच दैवज्ञ असें समजावें.

**मला कोणत्या दिशेस लाभ होईल या प्रश्नाचें उत्तर.**

चरेलग्नेशुभैर्युक्तेलाभेचंद्रबलान्विते ॥

केंद्रत्रिकोणगैःसौम्यैर्लाभोविधिदिशिस्मृतः ॥ २४ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं चरलग्न असून तें शुभग्रहांनीं युक्त असेल आणि लाभस्थानीं बलाढ्य असा चंद्र असेल व १।४।७।१० व ९।५ या स्थानीं शुभग्रह असतील तर चंद्र ज्या राशीस असेल, त्या राशीची व चंद्राची कोणती दिशा आहे हें पाहून त्या दिशेस लाभ होईल म्हणून सांगावें.

केंद्रगोयदिलग्नेशःशुभैर्दृष्टोयुतोऽपिवा ॥

लग्नपोवात्रिकोणस्थश्चंद्राग्रेक्षेमदायकः ॥ २५ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालाच्या लग्नाचा स्वामी केंद्रस्थानीं असून शुभग्रहांनीं युक्त किंवा पाहिलेला अथवा चंद्राशीं युक्त असा नवमस्थानीं असेल तर प्रवास करणारास क्षेमानें प्रवास होईल.

युद्धांत कोणत्या दिशेस घात झाला याविषयीं.

तिथिवारंचनक्षत्रंयुक्तंवेदसमन्वितं ॥
अष्टभिस्तुहरेद्भागंयुद्धेघातश्चतद्दिशि ॥ २६ ॥

अर्थ.—ज्या वेळेस प्रश्न केला असेल त्या वेळेस शुक्लपक्षापासून जी तिथि असेल ती, त्या दिवशीं जो वार असेल तो, जें नक्षत्र असेल तें एकत्र करून त्यांत चार मिळवावे आणि आठांनीं त्यास भागून जो भागाकराचा अंक येईल त्या खुणेवर पूर्वादि अष्टदिशांच्या अनुक्रमानें जी दिशा येईल त्या दिशेस युद्धांत घात झाला आहे असें सांगावें.

लाभाविषयीं निश्चय.

चंद्रोलग्नपतिर्वापितनयस्याग्रतोभवेत् ॥
दानेनधनलाभःस्याद्विपरीतोऽर्थलाभकृत् ॥ २७ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालचे लग्नाचा अधिपति किंवा चंद्र प्रश्नलग्नापासून पंचमस्थानाचे पुढें असेल तर प्रश्न केलेल्या कार्यापासून निश्चयानें दानधर्म केल्यावांचून लाभ होणार नाहीं, आणि ते जर पंचमस्थानाचे पूर्वीं असतील तर निश्चयानें प्रश्नकर्त्यास द्रव्यलाभ होईल.

ऋण मिळेल किंवा काय अशाविषयीं.

लग्नसप्तमभावस्थाःशुभाःस्युर्लाभकारकाः ॥
सविधुर्लग्नपःषष्ठंपश्येच्चेदृणलाभकृत् ॥ २८ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं जर सप्तमस्थानीं, लग्नीं आणि लाभस्थानीं शुभग्रह असतील तर प्रश्न केलेल्या कार्यापासून लाभ होईल; परंतु लग्नेश्वर चंद्राशीं युक्त असून जर षष्ठस्थान पाहील तर प्रश्नकर्त्यास निश्चयानें ऋण मिळेल.

माझें कार्य केव्हां होईल याविषयीं.

लग्नाधिपोयदालग्नंपश्येत्कार्यंचकार्यपः ॥
कार्यस्वामीयदालग्नंलग्नस्वामीचकार्यभम् ॥ २९ ॥
लग्नलाभपतीलग्नेकार्येवाशुभवीक्षिते ॥
तदाकार्यंसुसिद्धंस्याच्चंद्रेणायुतलोकिते ॥ ३० ॥

अर्थ.—प्रश्नकालींचा लग्नेश्वर जर प्रश्नलग्न पाहील आणि दशमेश दशमस्थान पाहील अथवा दशमेश लग्नीं पाहील आणि लग्नेश दशमभावीं पाहील, किंवा लग्नेश व लाभेश हे लग्नीं असून दशमस्थान शुभग्रहांनीं पाहिलें असेल, आणि तेंच दशमस्थान चंद्रानें युक्त किंवा पाहिलें नसेल तर निश्चयानें तें कार्य सिद्ध होईल.

कार्येश्वरोलग्नगतश्चपश्येल्लग्नेश्वरंसिद्धिमुपैतिकार्यं ॥
कार्येश्वरोनेक्षतिलग्ननाथंलग्नंचतत्कार्यविनाशमाहुः॥ ३१ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं दशमेश लग्नीं असून लग्नेश्वरास पाहील तर तें कार्य निश्चयानें

सिद्ध होईल आणि जर दशमेश, लग्न किंवा लग्नपतीस पहातही नसेल तर तें कार्य होणार नाहीं. त्याचा नाश होईल.

**मी काम करतों आहें याविषयीं कसें अशाविषयीं.**

लग्नेशःकार्येशंविलोकतेलग्नकार्यपंचेशाः ॥
सितगुरुयुतदृष्टावापरिपूर्णाकार्यसिद्धिःस्यात् ॥ ३२ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं लग्नेश्वर दशमेशास पाहील आणि लग्न, दशम, पंचम या भावांचे अधिपति शुक्रगुरूंशीं युक्त किंवा पाहिलेले असे असतील तर परिपूर्ण कार्यसिद्धि होईल.

**अक्षरप्रश्न.**

प्रश्नाक्षरंद्विगुणितंसैकयुग्वह्निभाजितम् ॥
एकेसिद्धिर्द्विकेस्थैर्यंशून्येशून्यफलंभवेत् ॥ ३३ ॥

**अर्थ.**—जोशानें स्वस्थांतःकरणानें प्रश्न करणारानें जो प्रश्न केला त्याचीं अक्षरें किती झालीं तीं मोजून दुप्पट करावीं, आणि त्यांत एक मिळवावा, नंतर त्यांस तिहींनीं भागावें, आणि जर एक शेष राहिला तर कार्य निश्चयानें होईल, दोन राहिले तर कार्य होणार नाहीं, आणि जर शून्य शेष राहिलें तर शून्यफल होईल असें समजावें.

**अथ मुष्टिप्रश्न.**

प्रश्नाक्षरंद्विगुणितंसैकंपावकभाजितम् ॥
विषमांकेजीवमेवसमेधातुःप्रकीर्तितः ॥
मूलंशून्येविजानीयाच्छारदावचनंतथा ॥ ३४ ॥

**अर्थ.**—प्रश्नाचीं अक्षरें दुप्पट करून त्यांस तिहींनीं भागून एक शेष राहिला तर मुष्टींत जीव आहे, दोन राहिले तर धातु आहे आणि शून्य राहिलें तर मूळ आहे असें शारदादेवीचें वचन आहे.

**अथ दृष्टिप्रश्न.**

ऊर्ध्वदृष्टिर्भवेज्जीवस्त्वधोदृष्टिश्चमूलकम् ॥
समावलोकनेधातुर्ज्ञेयंकेवलदृष्टितः ॥ ३५ ॥

**अर्थ.**—जोशानें सूक्ष्मदृष्टीनें प्रश्न करावयास येणाराकडे पाहूनच त्याचे मनांतील विचार सांगावे. जर त्याची दृष्टि ऊर्ध्व असेल तर त्याचे मनांत जीवचिंता आहे असें जाणावें; आणि खालीं जर पहात असेल तर मूलपदार्थाची चिंता आहे असें समजावें, आणि जर समदृष्टीनें पहात आला असला तर त्यास धातूची चिंता आहे असें जाणावें.

**अंकप्रश्न.**

इष्टमंकंद्विगुणितंचैकेनसहितंतुयत् ॥
त्रिभिश्चैवहरेद्भागंशेषंसत्त्वंरजस्तमः ॥ ३६ ॥

**अर्थ.**—जो प्रश्न करावयास येईल त्यास जोशानें नऊ अंकांपैकीं एक अंकाचा उच्चार

करावयास सांगावा आणि तो ज्या अंकाचा उच्चार करील तो अंक दुप्पट करावा आणि त्यांत एक मिळवावा व तो तिहींनीं भागून शेषांकावरून फल समजावें. शेष एक राहिला तर सत्त्वगुण, दोन राहिले तर रजोगुण आणि शून्य शेष राहील त्याचें नांव तमोगुण.

सत्त्वेशीघ्रंफलंवाच्यंरजोवेलासुमध्यमम् ॥
तमसानिष्फलंकार्यंशारदावचनंतथा ॥ ३७ ॥

अर्थ.—जर भाग एक म्हणजे सत्त्वगुण राहील, तर प्रश्नकर्त्याचें कार्य सत्वर होईल. जर दोन म्हणजे रजोगुण शेष राहील, तर वेळ अधिक लागेल, आणि जर शून्य राहील तर तमोगुण शेष राहिला म्हणून तें कार्य होणार नाहीं अशाविषयीं शारदादेवीचें वचन आहे.

विषमांकेजीवचिंतासमेधातुःप्रकीर्तितः ॥
तरुधान्यादिकाचिंताशून्यंशेषंयदाभवेत् ॥ ३८ ॥

अर्थ.—जर विषम म्हणजे एक शेष राहील तर प्रश्नकर्त्यास जीवचिंता आहे असें समजावें. समांक म्हणजे दोन शेष राहतील तर धातूची चिंता आहे असें समजावें, आणि जर शून्य शेष राहील तर झाडें, धान्यें, तृण इत्यादिकांची चिंता असावी असें समजावें.

## चिंताप्रश्न.

द्विपादाचिंताप्रथमेनराणांचतुष्पदानांवृषभेच
चिंता ॥ स्याद्गर्भचिंतामिथुनाख्यराशौकर्के
भवेत्साव्यवहारिकाच ॥ ३९ ॥

अर्थः—जर प्रश्नकालीं मेषलग्न असेल तर मनुष्यचिंता आहे आणि वृषभलग्न असेल तर चतुष्पदांची चिंता आहे असें जाणावें. जर मिथुन लग्न असेल तर गर्भाची चिंता आहे असें समजावें. आणि जर कर्कलग्न प्रश्नकालीं आहे तर व्यवहाराची चिंता आहे असें जाणावें.

स्याद्वाजिचिंताहरिनाम्निराशौवरांगनास्यादथ
कन्यकायाम् ॥ वाणिज्यचिंतातुलनाम्निराशौ
स्याद्वृश्चिकेदुष्टभयादिचिंता ॥ ४० ॥

अर्थ.—प्रश्नकालीं सिंहलग्न असेल तर घोड्याची चिंता आहे, कन्यालग्न असेल तर कन्येची चिंता आहे. तूललग्न असेल तर वाणीपणाची चिंता असावी आणि वृश्चिकलग्न असल्यास दुष्टभयादिकाची चिंता असावी.

धनेचलाभोमकरेकलिश्चस्यात्कर्मचिंताघटना-
म्निराशौ ॥ स्थानस्यमीनेसुधियाविचिंत्यायो
राशिरंगेषुलवोद्धृतःस्यात् ॥ ४१ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं धनलग्न असेल तर लाभाविषयीं चिंता आहे. मकरलग्न असेल तर कलहसंबंधीं चिंता आहे. जर कुंभलग्न असलें तर कर्माविषयीं चिंता आहे व मीनलग्न असेल तर जागेविषयीं चिंता आहे असें समजावें, आणि जें लग्न असेल त्याचा षड्भाग करावा.

माझें जाणें केव्हां होईल अशाविषयीं प्रश्न.

लग्नास्तरंध्रगोभानुर्यदिवाभूमिनंदनः ॥

गमागमौनरेंद्राणांनकरोतिकदाचन ॥ ४२ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं लग्न, सप्तम, अष्टम या भावीं रवि किंवा मंगळ असतील तर ते राजेलोकांचें जाणें किंवा येणें होऊं देणार नाहींत.

लग्नेचरेलग्नपतौविलग्नेवित्तेसपापेगमनंत्वकस्मात् ॥

तथातृतीयेद्युमणौचयात्राभवेत्तदाचंद्रकुजैर्विशेषात् ॥ ४३ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं लग्न चर असून लग्नेश्वर लग्नीं किंवा धनभावीं पापग्रहांशीं युक्त असेल आणि तृतीय भावीं रवि, चंद्रमंगळांशीं युक्त असेल तर निश्चयेंकरून यात्रा होईल.

चरोदयेशीतकरेचरस्थेसौम्यग्रहैःसंयुतवीक्षिते

वा ॥ यात्राभवेत्सौख्यजयार्थसिद्ध्यैकल्याण-

दात्रीनिरुपद्रवाच ॥ ४४ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं चरलग्न असून चंद्रही चरलग्नीं असेल आणि तो चंद्र शुभग्रहांनीं युक्त किंवा शुभ ग्रहांनीं पाहिलेला असा असेल तर सौख्य, जय व द्रव्यलाभ करणारी आणि उपद्रवरहित अशी यात्रा प्रश्नकर्त्यास होईल असें समजावें.

स्थिरोदयेशीतकरेस्थिरस्थेसौम्यग्रहैःसंयुतवीक्षितेवा ॥

प्रष्टुःप्रवासोनभवेसुधाम्नःक्षितिप्रतिष्ठाशुभसिद्धयःस्युः॥ ४५ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं स्थिरोदय लग्न आहे आणि चंद्रही स्थिर राशीसच आहे व तो चंद्र दुसऱ्या शुभ ग्रहांनीं संयुक्त किंवा पाहिलेला आहे, तर प्रश्नकर्त्यास चांगल्या घरांतून प्रवास होणार नाहीं; परंतु पृथ्वीवर त्याची प्रतिष्ठा वाढेल आणि त्यास शुभ अशा सिद्धी होतील.

द्व्यंगोदयेद्व्यंगगतेहिमांशौपापग्रहैर्दृष्टयुतेनसौम्यैः ॥

प्रष्टुर्निवृत्तिःपरदेशयानेक्लेशान्निवृत्तिश्चभवेत्तदासा ॥ ४६ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं चंद्र द्विस्वभाव राशीस असून लग्नही उभयोदयच आहे आणि पापग्रहांनीं युक्त किंवा पाहिलेला असून सौम्यांनीं युक्त अथवा पाहिलेला नाहीं, तर प्रश्न करणाराचें परदेशीं जाणें क्लेशापासून दूर करण्याविषयीं होईल असें समजावें.

क्रूरेकलत्रेऽष्टगतेयदर्थंतत्कार्यनाशोगमनंचनस्यात् ॥

पापग्रहैः कर्मगतैर्नमानःस्याज्ज्येष्ठबंधोर्नृपतेर्निषेधात् ॥ ४७ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं क्रूर ग्रह सप्तम किंवा अष्टम स्थानीं असेल तर प्रश्नकर्त्याच्या कार्याचा नाश होऊन त्याचें गांवीं जाणें होणार नाहीं, आणि जर दशमस्थानीं पापग्रह असतील तर वडील बंधूच्या अथवा राजाच्या निषेधापासून मान किंवा प्रतिष्ठा मिळणार नाहीं.

त्रिलाभषष्ठोपगतैश्चपापैःप्रयाणकार्यादिषुसिद्धिरेव ॥

मार्गान्निवृत्तिश्चरसातलस्थैर्भूयाच्छुभैःकेंद्रगतैर्नसिद्धिः॥ ४८ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं तृतीय, लाभ, षष्ठ या भावीं पापग्रह असतील तर प्रयाणसंबंधीं जीं कार्यें आहेत तीं सर्व सिद्ध होतील; आणि सप्तमस्थानीं पापग्रह असून केंद्रीं (१।४।७।१०) जर शुभग्रह असतील तर प्रश्न करणाराची मार्गांतून निवृत्ति न होतां कार्यसिद्धिही होणार नाहीं.

अमुक मनुष्य केव्हां येईल अशाविषयीं प्रश्न.

धनसहजगतौसितामरेज्यौकथयतमागमनंप्रवासिपुंसां ॥
सुतमदनगताविमौसचंद्रौझटितिनृणांकुरुतोगृहप्रवेशं॥ ४९ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं धन आणि सहज या भावीं शुक्र आणि बृहस्पती असतील तर प्रवासी मनुष्य सत्वर येईल आणि हेच शुक्र, गुरु, चंद्रसहित असे पंचमस्थानीं किंवा सप्तम स्थानीं असतील तर प्रवासी मनुष्य फार लवकर घरीं येईल.

अर्कार्किजज्ञासुरपूजितानांचरोदयस्थोयदिकश्चिदेकः ॥
गमागमौक्षिप्रमुदाहरंतिवक्रोपयातैर्नपुनःसएति ॥ ५० ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं सूर्य, शनि, बुध, शुक्र यांतून कोणताही ग्रह चरलग्नीं असेल तर प्रवासी मनुष्य लवकर येईल, अथवा प्रवासास कोणी जाणारा असेल तर तो लवकर जाईल, आणि यांपैकीं जर कोणी ग्रह वक्रगत असेल तर प्रवासी लवकर घरीं येणार नाहीं. जाणारा असेल त्याचें जाणें होणार नाहीं.

केंद्रेद्वितीयेखचरोयदायातितदागमः ॥
केंद्राच्चंद्रोच्चभंयातितदागंतानगच्छति ॥ ५१ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर केंद्र किंवा धन या भावीं कोणताही ग्रह येईल तर प्रवासी प्राणी लवकर घरीं येईल आणि चंद्र त्याच प्रश्नाच्या वेळीं अगर पूर्वीं केंद्र सोडून उच्च राशीस येईल तर गांवास जाणाऱ्या मनुष्याचें जाणें होणार नाहीं.

द्वितीयेवातृतीयेवाविलग्नादथवासुखात् ॥
सौम्याःकुर्वंतिनष्टाप्तिमागमंचप्रवासिनाम् ॥ ५२ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नलग्नापासून द्वितीय अथवा तृतीय या स्थानीं किंवा चतुर्थ भावापासून दुसऱ्या अथवा तिसऱ्या ठिकाणीं शुभग्रह असतील तर नष्ट पदार्थाची प्राप्ति होईल आणि गांवास गेलेला मनुष्य लवकर घरीं येईल.

चिंतिलेलें कार्य केव्हां होईल अशाविषयीं प्रश्न.

प्रश्नाक्षरदिशावारप्रहरानाडिमिश्रिताः ॥
नवभिस्तुहरेद्भागंशेषेणफलमादिशेत् ॥ ५३ ॥

**अर्थ.**—जोशानें, प्रश्न करणारानें किती अक्षरें उच्चारून प्रश्न केला, हें ध्यानांत आणून तीं अक्षरें, ज्या दिशेस प्रश्न करिते वेळीं त्या पृच्छकाचें तोंड असेल ती दिशा, व त्या वेळचे वार, प्रहर, घटिका इतके एकत्र करून त्या संख्येस नवांनीं भागून शेष उरेल त्यावरून फल पहावें.

नदृश्यतेऽष्टद्वितयेचकार्यंरसैःसमुद्रैर्निजकार्यसिद्धिः ॥

सप्तत्रयैकेकथयंतिवार्तांनवपंचकेकार्यसुसिद्धिमाहुः ॥ ५४ ॥

**अर्थ.**—आठ व दोन शेष राहिले तर कार्य होणार नाहीं. चार आणि सहा शेष उरतील तर कार्य सिद्ध होईल. ७।३।१ असे शेष राहिले तर संभव आहे आणि ९।५ उरले तर निश्चयानें कार्य होईल असें सांगावें.

**किती दिवसांनीं प्रवासी मनुष्य घरीं येईल अशाविषयीं प्रश्न.**

ग्रहःसर्वोत्तमबलोलग्नाद्यस्मिन्गृहेस्थितः ॥
मासैस्तत्तुल्यसंख्याकैःप्रवृत्तिर्यातुरादिशेत् ॥ ५५ ॥

**अर्थ.**—प्रश्नलग्नांत जो ग्रह लग्नापासून सर्वोत्कृष्ट बलाढ्य असा ज्या भावीं असेल तो भाव जितक्या संख्येचा होईल तितक्या महिन्यांनीं प्रवासी मनुष्य घरीं येईल असें सांगावें.

विलग्नचंद्रांतरभागाविधेयात्राविलग्नेखगुणैर्विभक्ते ॥
आयातिराजाखलुलब्धमासैर्दिनेघटीभिस्तुयथाविभक्तं ॥५६॥

**अर्थ.**—प्रश्नकालचें तात्कालिक अंशात्मक लग्न आणि तात्कालिक अंशात्मक स्पष्ट चंद्र घेऊन त्यांचें परस्पर अंशात्मक अंतर काढावें; आणि त्या अंतरानें प्रश्नलग्नापासून यात्रालग्न म्हणजे सातवें लग्न गुणावें, आणि त्यास ख म्हणजे शून्य आणि गुण म्हणजे तीन मिळून ३० यांनीं भागून जो भागाकार येईल त्या अंशाइतक्या दिवसांनीं, कला इतक्या घटकांनीं आणि विकला इतक्या पलांनीं प्रवासी मनुष्य घरीं येईल.

ग्रहोविलग्नाद्यतमेगृहेतुतेनाहताद्वादशराशयश्च ॥
लब्धैर्दिनैर्यातिनरःप्रवासीनिवर्तनंवक्रगतैर्ग्रहैर्न ॥ ५७ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जो ग्रह लग्नीं अथवा लग्नाजवळच्या ज्या राशीस असेल त्या राशीनें द्वादशराशी भागाव्या आणि जो भागाकार येईल तितक्या दिवसांनीं प्रवासी घरीं येईल असें सांगावें, आणि ज्या राशीनें भागलें त्या राशीचे ग्रह वक्रगत असतील तर प्रवासी लवकर घरीं येणार नाहीं.

**अथ पंथप्रश्न.**

तिथिप्रहरसंयुक्तंतारकावारमिश्रितम् ॥
सप्तभिस्तुहरेद्भागंशेषेणफलमादिशेत् ॥ ५८ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जी तिथि असेल ती शुक्लप्रतिपदेपासून मोजावी आणि त्या वेळेस जो प्रहर असेल तो, त्या वेळेस जें नक्षत्र असेल तें आणि जो वार असेल तो अशा तिथ्यादि सर्व संख्यांची बेरीज करून त्या अंकास सातांनीं भागून जो अंक शेष राहील त्यावरून फल सांगावें.

एकेनतत्रसंयुक्तोद्वाभ्यामागमनेसुखी ॥
तृतीयेचार्धमार्गस्थोचतुर्थेग्रामसन्निधौ ॥ ५९ ॥

**अर्थ.**—एक शेष उरला तर येणारा गृहस्थ जागेवर आहे; दोन उरले तर मार्गानें

सुखरूप येतो आहे; तीन उरले तर अर्धमार्गावर आला आहे व चार उरले तर गांवाजवळ अथवा गांवांत आला आहे.

पंचमेपुनरावृत्तिःषष्ठेव्याधिसमुद्भवः ॥
सप्तमेमरणंविद्याच्छारदावचनंयथा ॥ ६० ॥

**अर्थ.**—५ शेष उरले तर यावयास निघालेला पुनः माघारा गेला. ६ उरले तर येणारास कांहीं व्याधि आहे आणि ७ उरले तर तो मेला असें समजावें. याप्रकारें हें शारदादेवीचें भाषण आहे असें जाणावें. आतां ज्या एकंदर बेरीज झालेल्या अंकांस पूर्वी सातांनीं भागावें म्हणून सांगितलें त्यांसच आठांनीं भागावें आणि एकादि भागाकार शेषांकांनीं रविचंद्रादिकांच्या संज्ञा समजून खालीं लिहिल्याप्रमाणें फळें समजावीं.

रविरंगारकौदूरंमार्गंचगुरुचंद्रयोः ॥
बुधशुक्रौसमीपंचशनिराहूस्थिरंवदेत् ॥ ६१ ॥

**अर्थ.**—एक आणि तीन शेष उरले तर ते रवि आणि भौम आहेत; तच आले तर येणारा प्रवासी दूर गेला असें जाणावें; ५।२ उरले तर ते गुरु, चंद्र समजावे. हे आले तर तो येणारा मार्गांत आला आहे असें समजावें. ४।६ उरले तर बुध आणि शुक्र असे जाणावे; हे आले तर येणारा जवळ आला असें समजावें; आणि ७।८ उरले तर शनि, राहु समजावें आणि येणारा लवकर येत नाहीं असें सांगावें.

### हरवलेल्या वस्तूविषयीं प्रश्न.

राहुर्वारविसूनुर्वाभृगुर्वाभूमिजोऽपिवा ॥
लग्नात्रिपंचसप्तस्थोनष्टद्रव्यंहिलभ्यते ॥ ६२ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं लग्नीं आणि लग्नापासून तृतीय, पंचम, सप्तम या भावीं राहु, शनि, शुक्र, आणि मंगळ यांतून कोणताही ग्रह असेल तर हरवलेलें किंवा चोरीस गेलेलें द्रव्य मिळेल.

लग्नात्रिकर्मात्मजमित्रधर्मलाभार्थगैःसौम्यखगैर्बलाढ्यैः ॥
केंद्रत्रिकोणाष्टमलाभवर्ज्यैःपापैर्भवेन्नष्टधनस्यलाभः ॥ ६३ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर लग्न तृतीय, दशम, पंचम, चतुर्थ, नवम आणि लाभ या भावीं शुभग्रह असून, लग्न चतुर्थ, सप्तम, दशम, पंचम, नवम, अष्टम आणि लाभ या भावांतून पापग्रह नसतील तर चोरीस गेलेलें किंवा हरवलेलें द्रव्य मिळेल.

केंद्रत्रिकोणाष्टमवित्तसंस्थैःपापग्रहैश्चाशुभवीक्षितैश्च ॥
सौम्यैरयुक्तैःखलुवित्तसंस्थैर्नाशोभवेदन्यधनस्यचापि॥ ६४ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर लग्न, चतुर्थ, सप्तम, दशम, पंचम, नवम, अष्टम आणि द्वितीय या स्थानीं पापग्रह असतील किंवा हे भाव पापग्रहांनीं पाहिले असतील आणि यांशीं सौम्यग्रह युक्त नसून केवळ धनस्थानही असें असेल तर जें द्रव्य चोरीस गेलें असेल त्याहून प्रश्नकर्त्याच्या दुसऱ्या धनाचा नाश होईल.

यस्मिन्राशौभवेच्चंद्रस्तद्राशेरधिपेनचेत् ॥
दृश्यतेचंद्रमाःप्रश्नेतदानष्टंचलभ्यते ॥ ६५ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं चंद्र ज्या राशीस असेल त्या राशीच्या स्वामीनें जर चंद्रास पाहिलें असेल तर नष्ट झालेली वस्तु सांपडेल

चोर कोणत्या स्थानीं आहे अशाविषयीं प्रश्न.

लग्नाच्चंद्रोभवेद्यत्रतत्रचोरगृहंवदेत् ॥
इतिश्रीशारदादेव्याभाषितंनान्यथाभवेत् ॥ ६६ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं लग्नापासून चंद्र ज्या दिशेस असेल त्या दिशेस चोराचें स्थान आहे म्हणून सांगावें. असें शारदादेवीचें वचन आहे. म्हणून ही गोष्ट अन्यथा होणार नाहीं.

चोराची जाति वगैरेविषयीं.

ब्राह्मणःक्षत्रियोवैश्यःशूद्रोवास्वजनोऽंगना ॥
भ्रातापुत्रोऽथभृत्यश्चस्नुषावामूषकोऽथभूः ॥ ६७ ॥
मेषादिषुक्रमाज्ज्ञेयंनामैवंराशितुल्यकम् ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जें लग्न असेल त्यास मेषादि क्रमानें मोजून तें लग्न जितक्या संख्येचें येईल तितक्याच संख्येचें, ब्राह्मण आदिकरून बारा नांवांतलें चोराचें नांव सांगावें. तें असें कीं, मेष लग्न प्रश्नकालीं असल्यास ब्राह्मण चोर आहे. वृषभ असल्यास क्षत्रिय, मिथुन असल्यास वैश्य, कर्क असल्यास शूद्र, सिंह असल्यास स्वजन, कन्या असल्यास अंगना, तूळ असल्यास भाऊ, वृश्चिक असल्यास पुत्र, धन असल्यास चाकर, मकर असल्यास सून, कुंभ असल्यास उंदीर. मीन असल्यास भूमि याप्रमाणें सांगावें.

चोरी घरांत आहे किंवा काय अशाविषयीं.

चरेदूरंविजानीयात्स्थिरेगृहगतंवदेत् ॥ ६८ ॥
द्विस्वभावेभवेद्बाह्येगृहेत्रिविधमाचरेत् ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर चर लग्न असेल तर द्रव्य दूर गेलें आणि स्थिर लग्न असेल तर घरांत आणि जर द्विस्वभाव असेल तर द्रव्य घराच्या बाहेर आहे; असे घरांत तीन प्रकारचे विचार करावे.

चोरी कोणत्या दिशेस आहे अशाविषयीं.

यदिचंद्रोभवेल्लग्नेतदापूर्वगतंवदेत् ॥ ६९ ॥ दशमस्थानगेचंद्रेतदानष्टंचदक्षिणे ॥ चतुर्थेतुभवेच्चंद्रस्तदासौम्यदिगुच्यते ॥ ७० ॥ सप्तमस्थानगेचंद्रेपश्चिमादिक्प्रकीर्तिता ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर चंद्र लग्नीं असेल तर द्रव्य पूर्वेस आहे असें सांगावें आणि त्या प्रश्नलग्नापासूस दशमस्थानीं चंद्र असेल तर चोरी दक्षिणेस आहे व चतुर्थस्थानीं असेल तर

चोरी उत्तरेस आहे आणि सप्तमस्थानीं असेल तर पश्चिमेस; या प्रकारें प्रश्नलग्नापासून चार स्थानीं चंद्र असतां चार दिशा सांगाव्या.

### हाच प्रश्न अन्य प्रकारानें.

प्रश्नाक्षरंद्विगुणितंद्वादशाक्षरसंयुतम् ॥ ७१ ॥
सप्तभिस्तुहरेद्भागंशेषांकेफलमादिशेत् ॥
अस्तिनास्तिमृतिर्लाभःसुखंदुःखंचसंपदः ॥ ७२ ॥

**अर्थ.**—प्रश्नकर्त्यानें प्रश्न करितेवेळीं जितकीं अक्षरें उच्चारून प्रश्न केला, तीं अक्षरें जोशानें सावधपणानें मोजून द्विगुणित करून आणखी त्यांत बारा मिळवून त्यास सातांनीं भागावें. नंतर शेषांक जो राहील त्यावरून सात फलें जाणावीं. तीं अशीं कीं, पहिलें आहे, दुसरें नाहीं, तिसरें मरण, ४ थें लाभ, पांचवें सुख, ६ वें दुःख, ७ वें म्हणजे पूर्ण शेष राहील तर संपत्ति, याप्रमाणें मोजून येईल तें फल सांगावें.

### हाच प्रश्न दुसऱ्या प्रकारानें.

प्रश्नाक्षरंद्विगुणितमष्टभिर्भागमाहरेत् ॥
आरार्कयोगतोदूरंसमीपेधनचंद्रयोः ॥
मार्गगंगुरुशुक्राभ्यांशनिराहौनदृश्यते ॥ ७३ ॥

**अर्थ.**—प्रश्नकारानें प्रश्न केलेलीं अक्षरें मोजून दुप्पट करावीं आणि त्यांस ८ नीं भागून भागशेष जो अंक राहील त्यावरून आठ ग्रहांच्या ८ संज्ञा कल्पून पुढें सांगितल्याप्रमाणें फलें जाणावीं; या संज्ञा रवीपासून अनुक्रमानें. आर म्हणजे ३ मंगळ आणि अर्क म्हणजे १ सूर्य हे शेष राहिले तर चोरी दूर गेली असें समजावें; बुध म्हणजे ४, चंद्र म्हणजे २ शेष राहिले तर चोरी जवळ आहे, शुक्र म्हणजे ६ गुरु म्हणजे ५ शेष राहिले असतां चोर मार्गांत आहे आणि शनि म्हणजे ७ राहु म्हणजे ८ असे शेष राहिले तर चोरी दृष्टीसही पडणार नाहीं असें समजावें.

### हाच प्रश्न नक्षत्रपरत्वें पाहणें.

अग्निभान्मध्यतोलेख्यंपूर्वादिषुत्रिकंत्रिकं ॥
झस्यांचंद्रस्यनक्षत्रंतत्रनष्टंगवेषयेत् ॥ ७४ ॥
चंद्रभादग्निपर्यंतंगणनीयंभमंडलं ॥
त्रिकंत्रिकंमध्यतःस्यादग्निभंमार्गउच्यते ॥ ७५ ॥

**अर्थ.**—नवकोष्ठांकित चक्र उत्पन्न करून त्यामध्यें कृत्तिकादि तीन नक्षत्रें मध्य कोष्ठांत लिहून बाकी आर्द्रादि तीन तीन नक्षत्रें पूर्वादि आठ दिशांत अनुक्रमानें लिहावीं. आणि ज्या वेळीं प्रश्न पाहणें त्या वेळीं जें चंद्रनक्षत्र असेल तें ह्या नवकोष्ठांकित चक्रांत ज्या दिशेस येईल त्या दिशेस चोरी आहे असें समजावें. आतां ही चोरी बाहेर कोणत्या द्वारानें गेली असें पाहणें असेल तर ह्याच पूर्वोक्त चक्रांत चंद्रनक्षत्रापासून तीन नक्षत्रें मध्य कोष्टकांत

कृत्तिकादि नक्षत्र त्रयस्थानीं लिहून बाकी पूर्वादि आठ दिशांस अनुक्रमानें तीन तीन लिहावीं आणि कृत्तिका नक्षत्र ज्या दिशेस येईल त्या दिशेकडून चोरी बाहेर गेली असें जाणावें.

| चोरी समजण्यासाठीं कृत्तिकादि अनुक्रमाचें चक्र | | |
|---|---|---|
| ईशानी.<br>२७ रेवती.<br>१ अश्विनी.<br>२ भरणी. | पूर्व.<br>६ आर्द्रा.<br>७ पुनर्वसु.<br>८ पुष्य. | आग्नेयी.<br>९ आश्लेषा.<br>१० मघा.<br>११ पूर्वा. |
| उत्तर.<br>२४ शततारका.<br>२५ पू० भा०<br>२६ उ० भा० | ३ कृत्तिका.<br>४ रोहिणी.<br>५ मृगशिर. | दक्षिण.<br>१२ उत्तरा.<br>१३ हस्त.<br>१४ चित्रा. |
| वायवी.<br>२१ उत्तराषाढा.<br>२२ श्रवण.<br>२३ धनिष्ठा. | पश्चिम.<br>१८ ज्येष्ठा.<br>१९ मूळ.<br>२० पूर्वाषाढा. | नैर्ऋत्य.<br>१५ स्वाती.<br>१६ विशाखा.<br>१७ अनुराधा. |

## चोरीविषयीं.

धनाधिनाथेप्रमदागृहस्थेवामाक्षिखेटेनानिरीक्षितेवा ॥
चोरोंगनास्याच्चततःपुमांस्तुचोरोनिवेद्यःस्मरभेन्ययुक्ते ॥७६॥

**अर्थ.**—प्रश्नलग्नापासून धनस्थानाचा स्वामी सप्तमभावीं असेल किंवा त्याला स्त्रीसंज्ञक ग्रहानें ( म्हणजे शुक्र किंवा चंद्र यांनीं पाहिलें असेल तर चोरी करणारी स्त्री आहे आणि धनाधिपावांचून अन्यग्रह सप्तमभावीं असेल तर पुरुष आहे असें सांगावें.

क्रूरक्रांतंयदालग्नं नभावस्तथैवच ॥ प्राप्ति-
र्हानिस्तथावाच्याशुभाशुभयुतेक्षणात् ॥ ७७ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीन लग्न क्रूर असून क्रूरग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल आणि सप्तमभावही तसाच क्रूर असून क्रूरग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर चोरी मिळणार नाहीं असें सांगावें. आणि प्रश्नलग्न व सप्तमभाव हे सौम्य असून सौम्यग्रहयुक्त किंवा दृष्ट असतील तर चोरी निश्चयानें सांपडेल. आतां लग्न क्रूर आणि क्रूराक्रांत किंवा क्रूरदृष्ट असून सप्तमभाव तसा नसेल तर चोरी मिळण्याविषयीं संशय आहे असें समजावें.

## पडलेलें किंवा विसरलेलें द्रव्य मिळण्याविषयीं.

हिबुकाधःस्थितेसूर्येचंद्रेवापतितंधनम् ॥
लभ्यतेचेद्दिनष्टांशुचंद्रलग्नेक्षणंनहि ॥ ७८ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं दशमभावीं चंद्र किंवा सूर्य असेल तर पडलेलें किंवा विसरलेलें द्रव्य मिळेल आणि त्याच प्रश्नलग्नास क्षीण चंद्र पूर्ण दृष्टीनें पहात असेल तर पडलेलें अथव विसरलेलें द्रव्य मिळणार नाहीं असें समजावें.

चोराची जाति समजण्याविषयीं.

अवनीशोदिनमणिस्तपस्वीरोहिणीप्रियः ॥
स्वर्णकारःक्षितिसुतोब्राह्मणस्तुगुरुःस्मृतः ॥ ७९ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जें तात्कालिक लग्न असेल त्याचा स्वामी जो येईल त्याची जाती खालीं लिहिल्याप्रमाणें जी येईल तीच चोरजाती समजावी. रवि लग्नेश असल्यास राजा, चंद्र लग्नेश असल्यास तपस्वी, मंगळ असल्यास सोनार, गुरु असल्यास ब्राह्मण.

वणिग्बुधःकविर्वेश्यावृषलःसूर्यनंदनः ॥
सैंहिकेयौनिषादश्चसर्वकार्येषुचिंतयेत् ॥ ८० ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं लग्नेश बुध येईल तर चोर वाणी आहे, शुक्र असेल तर वेश्या ( नायकिणीची जाति ) आहे, शनि लग्नेश असेल तर वृषल म्हणजे शूद्र जातीचा चोर आहे असें समजावें, आणि राहू*केतु येतील तर निषाद जातीचे ( भिल्ल जातीचे ) चोर आहेत असें समजावें.

गेलेली नौका किंवा तारूं केव्हां येईल अशाविषयीं.

नौकाकदायास्यतितस्यवाच्यंचंद्रोयदामृत्युगनःप्रपश्येत् ॥
वामृत्युनाथेनयदाहियोगस्तदातुनौकागमनंहिवाच्यं ॥ ८१ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर चंद्र मृत्युस्थानीं असून धनस्थान म्हणजे नौकास्थान पाहील किंवा मृत्युस्थानाचा स्वामी चंद्राशीं युक्त असेल तर निश्चयानें नौका येईल असें सांगावें.

यजमान केव्हां कृपा करील अशाविषयीं.

तिथिवारर्क्षयोगानांयोगोत्रैत्रिंशतायुतः ॥
अष्टभिस्तुहरेद्भागंशेषांकेफलमादिशेत् ॥ ८२ ॥

**अर्थ.**—पूर्वोक्त रीतीचा प्रश्न जर कोणीं केला तर त्या वेळेस जी तिथि वर्तमानकाळीं असेल तिच्या पूर्वींच्या तिथि शुक्ल प्रतिपदेपासून मोजाव्या. आणि त्यांत वर्तमान नक्षत्र असेल त्याच्या पूर्वींचीं नक्षत्रें व वर्तमान वाराच्या पूर्वींचे रविवारापासून वार आणि वर्तमानयोगाच्या पूर्वींचे योग मिळवावे, आणि त्यांत तीस मिळवून त्या एकंदर मिळवणीस आंठांनीं भागून शेषांकाप्रमाणें पुढें सांगितल्यासारखीं फलें सांगावीं.

एकशेषेकृपांविद्याद्वाभ्यांनैवास्तितत्कृपा ॥
तृतीयेबहुकालेनचिरस्थाचचतुर्थके ॥ ८३ ॥

---

* कन्याराहुगृहं प्रोक्तं मीनः केतुगृहं ॥ ॥ इति मतांतरम् ॥

अर्थ.—जर भागाकारांत एक बाकी राहील तर यजमान लवकर कृपा करील अथवा त्यानें पूर्वींच केली आहे असें समजावें. २ शेष राहतील तर यजमानाची कृपाच नाहीं असें समजावें. ३ बाकी राहिले तर बहुत अवकाशानें कृपा होईल. तसेच चार राहिले तरीही बहुत अवकाशानेंच यजमानाची कृपा होईल असें जाणावें.

दर्शनाच्चकृपाबाणेप्रसादबहुलारसे ॥
सप्तमेचकृपास्वल्पासेवयाचकृपाष्टमे ॥ ८४ ॥

अर्थ.—पांच बाकी उरले तर तो यजमान या प्रश्नकर्त्यास पहातांच कृपा करील. ६ शेष राहिले तर ज्या कृपेंत अनेक बक्षिसें असतात अशी प्रसादबहुला कृपा होईल. सात बाकी राहिले तर थोडीच कृपा होईल. आणि ८ राहिले असतां यजमानाची सेवा केल्या-वांचून कृपा होणार नाहीं असें समजावें.

आम्हांस आश्रय केव्हां मिळेल अशाविषयीं.

द्यूनेधनेकर्मगृहेचतुर्थेसौम्यायदास्युःस्वसुखंचतस्मात् ॥
तथैवचेत्युग्रखगायदास्युस्तदातुतस्मान्नसुखंवदंति ॥ ८५ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं सप्तमस्थानीं, धनस्थानीं, दशमस्थानीं आणि चतुर्थस्थानीं शुभग्रह असतील तर प्रश्नकर्त्यास स्वसुखच होईल, म्हणजे दुसऱ्याचा आश्रय केल्यावांचून त्याला नित्य सुखच होईल, आणि जर ह्याच पूर्वोक्तस्थानीं पापग्रह असतील तर त्याला स्वतःला सुख नसून आश्रयानेंही सुख होणार नाहीं.

मला अधिकार केव्हां मिळेल अशाविषयीं.

द्यूनाधिनाथश्चनिशाधिनाथोजलाधिनाथोगगनाधिनाथः ॥
वित्ताधिनाथोव्ययभावनाथःपरस्परंदृष्टियुतेपदाप्तिः ॥ ८६ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं सप्तमेश, चंद्र, सुखेश, धनेश आणि व्ययेश हे एकमेकांशीं युक्त किंवा दृष्ट असतील तर प्रश्नकर्त्यास पद मिळेल असें सांगावें.

द्यूनेऽष्टमेवायदिदैत्यपूज्योगुर्विदुजाभ्यांसहितेऽथदृष्टे ॥
महत्पदाप्तिंचततश्चचंद्रेमहत्पदंतत्प्रभुणार्पितंस्यात् ॥ ८७ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं सप्तमभावीं अथवा अष्टमभावीं जर शुक्र असेल, आणि गुरु व बुध यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर प्रश्नकर्त्यास त्याच्या यजमानानें त्यास दिलेल्या अधिका-रापासून त्यास सुख होईल.

मला फार मोठा अधिकार केव्हां मिळेल अशाविषयीं.

नवेंदवोवैतिथिवारऋक्षैर्युक्तास्त्रिभक्ताफलमत्रशेषे ॥
स्थानंस्थिरंचंचलतांगतेवागतंतथाभूश्चवराभ्रशेषे ॥ ८८ ॥

अर्थ.—एकुणीस अंकांत शुक्लपक्षापासून वर्तमान तिथीच्या पूर्वतिथीपर्यंत तिथी मिळवून एकंदर संख्येस तिहींनीं भागावें आणि शेष अंक राहील त्यावरून फल पहावें. जर एक उरेल तर फार मोठा अधिकार चिरकालपर्यंत राहणारा असा मिळेल. जर दोन शेष रहातील तर

तोच अधिकार मिळेल परंतु चंचळ होईल. आणि शून्य राहिलें असतां तो अधिकार दुसऱ्यास मिळाला असें समजावें.

### मिळालेला अधिकार स्थिर आहे किंवा चंचळ आहे अशाविषयीं.

चतुर्षुकेंद्रेषुयदार्कपुत्रःस्थानेतुकस्मिंश्चिदतोनिवेद्यं ॥
पदंस्थिरंवातनुवित्तनाथौयुक्तेक्षितौस्याद्विपरीतहानिः ॥ ८९ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं शनैश्चर चार केंद्रांतून ( १, ४, ७, १० यांतून ) कोणत्याही स्थानीं असेल तर प्रश्नकर्त्यास मिळालेला अधिकार स्थिर राहील, किंवा लग्नेश आणि धनेश हे परस्परांशीं युक्त अथवा दृष्ट असतील तरीही तो अधिकार स्थिर राहील आणि हे युक्त अथवा दृष्ट नसून शनीही केंद्रांत नसेल तर हें फल विपरीत म्हणजे उलटें होईल.

### गेलेलें राज्य केव्हां मिळेल अशाविषयीं.

कुमुदिनीपतिखाधिपलग्नपादशमभागवताःशुभवीक्षिताः ॥
यदितदानिजतुंगगताग्रहाभवतिराज्यपदंतुमहीपतेः ॥ ९० ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं चंद्र, दशमेश आणि लग्नेश हे तिघे ग्रह दशमभावीं असून शुभग्रहांनीं पाहिले असतलि किंवा हेच ग्रह जर स्वोच्च स्थानीं असतील तर प्रश्नकर्त्यास गेलेलें राज्य लवकर प्राप्त होईल असें सांगावें.

गगनपुत्रवधूधनधर्मपाःप्रथमभावविलोकनतत्परः ॥
सशशिनःपरभूमिपपालितंभवतिराज्यपदंहिमहीपतेः ॥ ९१ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं दशम, पंचम, सप्तम, नवम आणि धन या भावांचे स्वामी कोणत्याही भावीं राहून लग्नास पाहतील आणि त्यांत चंद्रही असेल तर दुसऱ्या राजानें संरक्षण केलेलें असें राज्य प्रश्नकर्त्यास मिळेल असें सांगावें

### झालेलें भय दुःख देईल किंवा काय अशाविषयीं.

उत्पन्नभीतौसवितविनाशेतिष्ठेच्छुभोवातनुपोविलग्ने ॥
पश्येत्तदानैवभयंसपश्येद्भयंभवेत्क्रूरयुतोविशेषात् ॥ ९२ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं सूर्य अष्टम स्थानीं असेल आणि लग्नीं शुभग्रह असेल आणि लग्नेश लग्नास पाहील तर झालेलें भय खोटें आहे असें समजावें आणि हेच योग जर क्रूर ग्रहांशीं युक्त असतील तर तेंच भय विशेष दुःख देईल असें जाणावें.

### आजारी मनुष्य बरा होईल किंवा मरेल अशाविषयीं.

लग्नपोमृत्युपश्चापिमृत्यौस्यातामुभौयदि ॥
स्थितौद्रेष्काणकेचैकेतदामृत्युंसमादिशेत् ॥ ९३ ॥

**अर्थः**—प्रश्नकालीं जर लग्नपति आणि अष्टमेश हे अष्टमस्थानीं असतील आणि एके द्रेष्काणीं असतील तर आजारी मरेल असें सांगावें.

द्यूनेव्ययेद्रव्यगतेचपापाच्छिद्राधिपोलग्नगतश्चमृत्युः ॥ ९४ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं सप्तम, द्वादश आणि धन या भावीं पापग्रह असतील आणि अष्टमेश लग्नीं असेल तर आजारी मरेल असें सांगावें.

**कोणी एका राजाचा किंवा मनुष्याचा बहुत दिवस शोध नाहीं तो आहे किंवा मेला अशाविषयीं.**

**लग्नपोलाभपश्चापिलाभेस्यातामुभौयदि ॥**

**स्थितौद्रेष्काणएकस्मिन्प्रभुलाभंसमादिशेत् ॥ ९५ ॥**

**अर्थ.**—जर लग्नेश आणि लाभेश प्रश्नकालीं लाभभावींच असून एका द्रेष्काणांत असतील तर ज्याचा शोध नाहीं त्या राजाचा लाभ होईल.

**छिद्रेलग्नेश्वरोलग्नेथचंऽद्रोमृत्युकारकः ॥**

**सपापोरिपुभेमृत्यौचंद्रोमृत्युस्तथाखिलैः ॥ ९६ ॥**

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर लग्नेश्वर अष्टमस्थानीं असेल आणि चंद्र लग्नीं असेल अथवा पापग्रहांशीं युक्त असा चंद्र मृत्युभावीं किंवा सर्व ग्रहांशीं युक्त असेल तर तो नष्ट झालेला मनुष्य मेलाच असें समजावें.

**लग्नेवर्गोत्तमगतेमृतीशेचंद्रसंयुते ॥**

**सूर्यभौमेऽथवाराहौतद्दिनेऽप्यसिनावधः ॥ ९७ ॥**

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर लग्नेश वर्गोत्तमीं असेल आणि अष्टमस्थानाचा स्वामी चंद्राशीं संयुक्त अथवा रवि भौम, राहू या ग्रहांनीं युक्त असेल तर तो मनुष्य ज्या दिवशीं नाहींसा झाला त्या दिवशींच तलवारीनें मरण पावला असें सांगावें.

**मजविषयीं उठलेली दुष्ट वार्ता खरी किंवा खोटी अशाविषयीं.**

**लग्नपोयदिकेंद्रेस्याच्चंद्रोवाशुभसंयुतः ॥**

**तदासत्याभवेद्वार्त्तापापयुक्तोमृषाभवेत् ॥ ९८ ॥**

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं लग्नेश केंद्रस्थानीं ( १, ४, ७, १० या स्थानीं ) असेल आणि चंद्र शुभग्रहांनीं युक्त असेल तर जी वार्ता ऐकिली ती खरी आहे असें समजावें आणि तोच चंद्र पापग्रहयुक्त असेल तर ती वार्ता खोटी आहे असें जाणावें.

**पत्राचें उत्तर केव्हां येईल अशाविषयीं.**

**बुधचंद्रौशुभेनैवग्रहेणयदिवीक्षितौ ॥**

**उत्तरंयातिसिद्धार्थेविपरीतंनचेत्तुतौ ॥ ९९ ॥**

**अर्थ.**—प्रश्नकालीं बुध आणि चंद्र हे जर एकस्थानीं असून त्यांस शुभग्रहांनीं पाहिलें असेल तर पत्राचें उत्तर मनांतील अर्थसिद्धि होऊन येईल असें जाणावें आणि तसे ग्रह नसतील तर कार्य झालें नाहीं असें समजावें.

**पत्र घेऊन येणारा मनुष्य केव्हां येईल अशाविषयीं.**

**चरेविलग्नेशुभखेटयुक्तेविलोकितेवाधनबंधुपाभ्यां ॥**

**मार्गात्तदायातिझटित्यवश्यंस्थिरेचिरेणद्विभवेनिवृत्तिः ॥ १०० ॥**

अर्थ.—जर प्रश्नकालचें लग्न चर असून शुभग्रहानें युक्त असेल आणि धनेश व पराक्रमेश यांनीं पाहिलें असेल तर पत्रग्राही मनुष्य मार्गांत आला आहे तो लवकर येऊन पोहोंचेल आणि हेच वरील योग स्थिर लग्नाशीं असल्यास कांहीं अवकाशानें येईल व द्विस्वभाव लग्नाशीं असल्यास तो मनुष्य येण्याचे विचारांत होता परंतु त्याचें राहणें झालें असें समजावें.

### बंदींत आहे तो केव्हां मुक्त होईल अशाविषयीं.

लग्नाधिपोलग्नगतोभवेद्वाआपोक्लिमेतंस्यपति-
र्यदावा ॥ स्याद्दुष्टयोगेनिगडाद्विमोक्षःशुभेतुविं-
द्यान्नितरांचबंधः ॥ १०१ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं लग्नेश्वर लग्नीं असेल अथवा तृतीय, षष्ठ, नवम, द्वादश, या भावीं असेल अथवा या भावांचे अधिपति याच भावीं असतील तर बंधमोक्ष होईल असें समजावें. परंतु हेच पूर्वोक्त योग जर पापग्रहांशीं युक्त होतील तर बंधमोक्ष लौकर होईल आणि शुभग्रहांचा योग झाला तर अधिक बंधन होईल असें समजावें.

चरेलग्नेचरेचंद्रेसप्तरात्रेणमुञ्चाति ॥
स्थिरेचंद्रेस्थिरेलग्नेपापयुक्तोभविष्याति ॥ १०२ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं चर लग्न असेल आणि चंद्रही चर राशीस असेल तर कैदी सात रात्रींनीं सुटेल आणि तेंच प्रश्नलग्न स्थिर असून चंद्रही स्थिरराशीस असेल तर कैदी सुटणार नाहीं.

वह्निभाद्दिनभंगण्यंसप्तशेषंचतत्फलम् ॥
स्थितिःशीघ्रंमनोमार्गःस्थितिर्विघ्नंशुभंसुखं ॥ १०३ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं जें वर्तमान नक्षत्र असेल त्याच्या पूर्वींच्या नक्षत्रापर्यंत कृत्तिका नक्षत्रापासून मोजून त्यांस सातांनीं भागावें आणि जी बाकी राहील तिजवरून कैदी सुटण्याविषयीं फलें पहावीं. १ उरेल तर कैदी बंदींत राहील; २ उरतील तर लवकर बंध खुला होईल; ३ उरले असतां तो सुटण्याच्या मार्गांत आहे; ४ उरले तर सुटणार नाहीं; ५ उरले असतां सुटण्यास विघ्न आहे; ६ उरले तर कल्याण होऊन सुटेल आणि ७ उरले असतां सुखानें सुटेल.

### सनद मिळाली परंतु तिजवर राजमुद्रा कधीं होईल अशाविषयीं.

दिवाकरोवारजनीकरस्यसूनुर्यदावादशमाधिपेन ॥
योगेक्षणेवापृथिवीपतेःस्यान्मुद्रातुपत्रेखलुलिख्यतेवा ॥१०४॥

अर्थ.—प्रश्नकालीं सूर्य अथवा बुध युक्त असून किंवा नसून जर दशमेशाशीं युक्त किंवा दृष्ट असेल तर सनदेवर राजमुद्रा लवकर होईल अथवा तिजविषयीं हुकूम तरी होईल.

महीधरस्याधिपतिःखलेनयुक्तेक्षितोवानहिलब्धि-
रस्याः ॥ १०५ ॥ स्वोच्चस्थितःस्वोच्चगतेनदृष्टो
लाभोविलेखेखलुमुद्रिकायाः ॥

अर्थ.—महीधर म्हणजे सर्प त्याच्या जातिसाम्यास मीनराशी आहे; त्या मीनराशीचा

अधिपती बृहस्पति, तो जर प्रश्नकालीं दुष्टग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तर राजमुद्रा होणार नाहीं आणि तोच बृहस्पति स्वोच्चगत किंवा दुसऱ्या उच्चस्थ ग्रहानें पाहिलेला असेल तर सनदेवर राजमुद्रा लवकर होईल असें समजावें.

### वादीचा जय होईल किंवा काय अशाविषयीं.

लग्नंसवीर्यंखलखेटयुक्तंदुष्टैस्तदावादिजयेनिषेधः ॥
स्यात्सप्तमंपापयुतंसवीर्यंजयोभवेत्तत्प्रतिवादिनस्तु ॥ १०६ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं शुभग्रहाचें लग्न असून मध्यांशांत असेल आणि दुष्ट ग्रहांनीं युक्त असेल तर वादीचा जय होण्यास निषेध आहे, आणि जर सप्तमस्थान पापग्रहाक्रांत असेल व तो सप्तमभाव बलढ्य असेल तर प्रतिवादीचा जय होईल असें समजावें.

### युद्ध होईल किंवा काय अशाविषयीं.

युद्धंभाविनवैप्रश्नेलग्नेशःसप्तमाधिपः ॥
युक्तौस्यातांतदायुद्धंभविष्यतिनचान्यथा ॥ १०७ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं लग्नेश आणि सप्तमेश यांचा संयोग नसेल तर युद्ध होणार नाहीं आणि त्यांचा संयोग असेल तर निश्चयानें युद्ध होईल.

### युद्धांत जय होईल किंवा पराजय होईल अशाविषयीं.

लग्नंवादशमंचास्तंसौम्याढ्यंस्वामिनोजयः ॥
तृतीयेनवमेषष्ठेपापश्चेद्रिपुणांजयः ॥ १०८ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं लग्न, दशम आणि सप्तम हे भाव सौम्य ग्रहांनीं युक्त व त्यांच्या अधिपतींनीं ते अधिष्ठित असे असतील तर प्रश्नकर्त्या यजमानाचाच जय होईल असें सांगावें. आणि जर तृतीय, नवम, षष्ठ या भावीं पापग्रह असतील तर शत्रूंचा जय होईल असें सांगावें.

द्यूतेयुद्धेविवादेचमरणेरोगशांतये ॥
क्रूरयूत्याजयोज्ञेयःक्रूरदृष्ट्यापराजयः ॥ १०९ ॥

**अर्थ.**—साधारणपणें जुवा, लढाई, कोर्टांतील तंटा, मरण, रोगापासून मुक्त होणें इत्यादि विषयीं जो भाव पाहणें तो क्रूर ग्रहांनीं युक्त असेल तर जय होईल आणि दृष्ट असेल तर पराजय होईल.

### युद्ध सुरू आहे यांत किती माणसें मरतील अशाविषयीं.

क्रूराक्रांतानियावंतिमध्येचंद्रविलग्नयोः ॥
तावंतःप्राणिनोवध्याद्वित्रिघ्नैःस्वांशकैःक्रमात् ॥ ११० ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं लग्नापासून चंद्र ज्या राशीस आहे त्या राशीपर्यंत मध्यें जे भाव असतील आणि तितक्यांतून जितक्यांत पापग्रह असतील तितकी संख्या दोन अथवा तीन यांनीं गुणून जो गुणाकार येईल तितकीं माणसें लढाईंत मरतील असें जाणावें.

### या वेळेस नारद कोठें आहे अशाविषयीं.

शुक्लादितिथ्योगतवासराढ्यानंदैर्युतारामविभाजिताःस्युः ॥

एकावशेषेसुरराजलोकेस्यान्नारदोमृत्युगतोद्वितीये ॥ १११ ॥
शेषैस्त्रिभिर्भोगिपुरेऽवतिष्ठत्तत्रैवयुद्धंखलुयत्रसंस्था ॥ ११२ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं शुक्ल प्रतिपदेपासून वर्तमान तिथीच्या पूर्व तिथीपर्यंत भुक्ततिथी मोजून त्यांत गतवासर मिळवून आणखी नऊ अंक मिळवावे आणि तिहींनीं भागून शेषांकावरून फल पहावें, जर एक शेष उरेल तर नारद स्वर्गांत आहे. दोन उरले तर मृत्युलोकीं आहे आणि तीन बाकी राहिले असतां पाताललोकीं आहे असें जाणावें. आणि ज्या लोकीं नारद असेल तेथें युद्ध आहे असें समजावें.

या वेळेस चंद्र कोठें आहे अशाविषयीं.

तिथिःपंचहताकार्याकृत्तिकाद्यैस्तुसंयुता ॥
ततोद्वादशभिर्युक्तानवभागावशेषिता ॥ ११३ ॥

अर्थ.—शुक्लप्रतिपदेपासून वर्तमान तिथीच्या पूर्वींच्या तिथी गणून त्यांस पांचांनीं गुणावें आणि त्या गुणाकारांत कृत्तिकांपासून वर्तमान नक्षत्राच्या पूर्वींचीं नक्षत्रें व आणखी बारा अंक असे मिळवून एकंदर संख्येस नवांनीं भागावें आणि शेषांकावरून पुढें लिहिल्याप्रमाणें फलें जाणावीं.

एकेचतुःसप्तजलेद्विपंचवसुभिःस्थले ॥
त्रिषण्णवभिराकाशेइत्युक्तंब्रह्मयामले ॥ ११४ ॥

अर्थ.—जर एक, चार, सात हे शेषांक राहिले तर चंद्र जलांत आहे असें जाणावें. दोन, पांच, आठ हे शेषांक उरले असतां चंद्र स्थलावर आहे आणि तीन, सात व नऊ असे उरले असतां चंद्र आकाशांत आहे असें समजावें.

तिथिश्चतुर्गुणाकार्यानक्षत्रैश्चसमन्विता ॥
त्रिभिर्भक्ताजलेकेनद्वाभ्यांभूमौतुखेनभे ॥ ११५ ॥

अर्थ.—शुक्ल प्रतिपदेपासून भुक्त तिथीपर्यंत मोजून त्यांस चहूंनीं गुणावें आणि भुक्तनक्षत्रें त्यांत मिळवावीं व त्यांस तिहींनीं भागून शेषांकाप्रमाणें फल पहावें; एक शेष उरला तर चंद्र जलांत आहे; दोन उरले तर भूमीवर आहे आणि शून्य शेष उरला असतां चंद्र आकाशांत आहे, असें जाणावें.

जलस्थःसर्वकार्याणिस्थलस्थोदुःखदःस्मृतः ॥
आकाशस्थेनचंद्रेणसर्वदादुःखमीरितं ॥ ११६ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं चंद्र जलस्थ असेल तर सर्व कार्यें सिद्ध होतील; स्थलांत असेल तर सर्व दुःखें देईल आणि आकाशांत असेल तर सर्व काळ दुःखच होईल.

या वेळेस चंद्र काय करितो आहे अशाविषयीं.

चंद्रराशिश्चतुर्गुण्योवारयुग्वह्नियुक्तथा ॥
चतुर्भक्तावशेषेणभूशेषेचंद्रमाःस्थितः ॥ ११७ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं चंद्र ज्या राशीस असेल तो राशी चहूंनीं गुणून गतवार संख्याही

त्यांत मिळवावी आणि त्यांत तीन मिळवून चहूंनीं भागावें आणि शेषांकावरून फल पहावें. १ एक शेष उरेल तर चंद्रमा उभा आहे असें जाणावें.

द्वाभ्यांचंद्रोनिविष्टस्तुत्रिभिर्जागर्तिचंद्रमाः ॥
चतुर्भिःसतुसुप्तःस्यादेवंचंद्रस्यलक्षणम् ॥ ११८ ॥

अर्थ.—दोन शेष उरले तर चंद्र बसला आहे. ३ उरले तर चंद्र जागृत आहे आणि शून्य उरलें असतां चंद्र निजला आहे असें चंद्रलक्षण जाणावें.

चंद्राची उन्नति कशी आहे अशाविषयीं.

मीनमेषद्वयेचंद्रःसततंदक्षिणोन्नतः ॥
शेषेउत्तरतःशृंगीसमत्वंवृषकुंभयोः ॥ ११९ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं चंद्र जर मीन व मेष या राशींस असेल तर तो नियमानें दक्षिणोन्नत आहे असें जाणावें, आणि वृषभ, कुंभ राशींस असतां सम आहे असें समजावें आणि बाकीच्या आठ राशींस चंद्र असतां उत्तरोन्नत चंद्रमा आहे असें समजावें.

चंद्राचा रंग कसा आहे याविषयीं.

मेषेवृषेसिंहगतेचरक्तोद्वंद्वेस्त्रियांमीनधनेचपीतः ॥
तुलालिकर्केषुचशुभ्रवर्णोमृगास्थितेकुंभगतेचकृष्णः ॥ १२० ॥

अर्थ.—प्रश्नकालीं चंद्रमा मेष, वृषभ, सिंह या राशींस असेल तर त्याचा रक्तवर्ण आहे असें समजावें, मिथुन, कन्या, मीन, धन या राशींस असतां चंद्रमा पीतवर्ण आहे असें समजावें. तूळ, वृश्चिक, कर्क या राशींस चंद्र असेल तर त्याचा वर्ण शुभ्र आहे असें जाणावें आणि मकर, कुंभ या राशींस चंद्र असतां त्याचा काळा रंग आहे असें जाणावें.

रक्तचंद्रेभवेद्युद्धंपीतचंद्रेभवेत्सुखम् ॥
शुभ्रचंद्रेऽर्थलाभश्चकृष्णचंद्रेमृतिर्भवेत् ॥ १२१ ॥

अर्थ.—प्रश्नसमयीं चंद्रमा जर लाल रंगाचा असेल तर युद्ध होईल. चंद्र पिंवळा असतां सुख होईल आणि शुभ्रवर्ण असतां द्रव्यलाभ होईल व चंद्रमा काळा असतां मृत्यु होईल असें जाणावें.

एवंविधंतुसच्चंद्रमाभिजानंतियेद्विजाः ॥
तेऽप्यन्येषांश्रियंहत्वास्वकमायांतिवैगृहम् ॥ १२२ ॥

अर्थ.—याप्रमाणें चंद्राच्या फलाविषयीं विचार करून जे कोणी कोणत्याहि कार्यास जातील ते दुसऱ्याच्या संपत्तीचें हरण करून स्वगृहीं येतील.

गुप्तपणानें हनन करण्याविषयीं.

रिपुंहंगामिष्यामिलग्नेक्रूरयुतेजयः ॥
विलग्नेस्वेशदृष्टेवाजयः प्रष्टुर्नसंशयः ॥ १२३ ॥

अर्थ.—कोणी मनुष्यानें असा प्रश्न केला कीं, मी माझ्या शत्रूस मारण्यासाठीं जात आहें,

तर त्या कामीं माझा जय होईल कीं काय? तर त्या कालचें लग्न क्रूर ग्रहानें युक्त असून लग्नेशानें पाहिलें असेल तर प्रश्न करणाराचा जय होईल असें समजावें.

**मी अमुक खटल्याचा सल्ला करीत आहें हा होईल किंवा नाहीं अशाविषयीं.**

नृराशिसंस्थाउदयेशुभाःस्युर्व्ययायसंस्थाश्चयदा
भवंति ॥ तदाशुसंधिंप्रवदेन्नराणांपापैर्द्विदेहोपग-
तैर्विरोधं ॥ १२४ ॥

**अर्थ.**—पुंग्रहाचें प्रश्नलग्न असून तेथें जर शुभग्रह असतील आणि लाभ व व्यय या भावींहीं शुभग्रह असतील तर आरंभ केलेला संधि लवकर होईल, परंतु पापग्रह जर द्विदेह राशीस म्हणजे धनराशीस असतील तर या संधीपासून द्वेष उत्पन्न होईल असें सांगावें.

संधिंकुर्यात्सुहृद्दृष्टिर्लग्नेशास्तपयोर्मिथः ॥
पृच्छायांलग्नपेक्रूरेसंधिर्जातोविनश्यति ॥ १२५ ॥

**अर्थ.**—संधि करणें आहे तर प्रश्नकालीं लग्नेश्वर आणि सप्तमेश यांची परस्पर दृष्टि असतां करावा. जर प्रश्नकालीन लग्नेश्वर क्रूर ग्रह असेल तर झालेला सल्ला मोडेल.

**अमुक किल्ला घ्यावयाचा आहे, त्याचा भंग होईल कीं काय अशाविषयीं.**

द्यूनेलग्नेयदापापाःसंस्थितोलग्नपोऽव्यये ॥
षष्ठेलग्नेऽथवाछिद्रेदुर्गभंगस्तदानाहि ॥ १२६ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं सप्तमभावीं आणि लग्नीं जर पापग्रह असतील व लग्नेश्वर व्ययभावीं किंवा षष्ठ, लग्न अष्टम या भावीं असेल तर किल्लयाचा भंग म्हणजे नाश होणार नाहीं.

लग्नेभौमोऽथवाराहुःक्रूरलग्नेनभंगकृत् ॥
यदिसप्तमगोराहुर्दुर्गभंगोभवेद्ध्रुवम् ॥ १२७ ॥

**अर्थ.**—प्रश्नसमयीं जर लग्नीं राहु अथवा भौम असून तें लग्न जर क्रूर असेल तर दुर्गभंग होणार नाहीं असें सांगावें. आणि जर प्रश्नलग्नीं राहु सातवा असेल तर निश्चयानें दुर्गभंग होईल असें जाणावें.

पापैःसुखव्योमगतैःपुरंचप्रवेष्टितंयेननरेश्वरेण ॥
स्वयंसनश्यत्याचिरेणदुर्गंत्यक्त्वारिपूणांभयविव्हलःसन् १२८

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं पापग्रह चतुर्थ, दशमभावीं असतील तर ज्या शत्रु राजानें शहर वेढून किल्लयावर हल्ला केला असेल, तो आपोआप नाश पावून शत्रूच्या भयानें विव्हल होत्साता तो दुर्ग टाकून पळून जाईल.

लग्नेसुतस्थेदशपेचजीवेसौख्यंप्रभूतंयदितेष्वरातिः ॥
निनृह्यतेदुर्गमिहोपगम्यंपराङ्मुखंतन्नवातिक्षणेन ॥ १२९ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं गुरु लग्नीं किंवा पंचमभावीं अथवा दशमभावीं असेल आणि शत्रूस जरी फार सौख्य होऊन त्यानें किल्ला घेतला असेल, तरी असें समजावें कीं, तें सर्व उलटें होईल.

**कोट किंवा गांव यांवर वेढा पडला किंवा नाहीं अशाविषयीं.**

वेष्टितंवानवाप्रश्नेधनेरिःफेसपापके ॥
तदातद्वेष्टितंवाच्यंदुर्गग्रामादिकंपरैः ॥ १३० ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर रिःफ ह्मणजे व्ययभावीं पापग्रह असेल, तर तो गांव किंवा तो कोट शत्रूनें वेढिला हें खरेपणीं समजावें.

द्वितीयरिःफेखचराःखलाश्चतद्वेष्टितंवाच्यमथोस्वहस्तात् ॥
आयेथवापापखगाभयंचकेंद्रोपगाश्चेद्रिपुभिर्गृहीतं ॥ १३१ ॥

**अर्थ.**—जर प्रश्नकालीं व्ययभावीं पापग्रह असेल, तर तो गांव किंवा किल्ला शत्रूनें वेढिला असें जाणावें. जर तेच पापग्रह लाभभावीं असतील, तर शत्रूंस भय होईल आणि जर ते पापग्रह लग्न, चतुर्थ, सप्तम, दशम या केंद्रभावीं असतील तर तो गांव व तो किल्ला शत्रूनें घेतलाच असें जाणावें.

**वेढिलेल्या कोटाचा भंग होईल कीं काय अशाविषयीं.**

खलाःखगाःकेंद्रगतायदास्युर्दुर्गंपरेषांस्वयमेवयाति ॥
पापाश्चमूर्तेश्चयदंतरालेगतैस्तुभागैःसमकैर्दिनैःस्यात् ॥ १३२ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं पापग्रह जर केंद्रीं असतील, तर तो किल्ला शत्रूंकडे आपोआप जाईल आणि लग्नापासून पापग्रह ज्या स्थानीं असतील तितक्या दिवसांत जितके भाग होतील, त्या तितक्या समभाग इतके दिवस गेल्यावर तें कार्य होईल.

सिंहोदयेतीव्रकरेणपापैर्दुष्टैर्विहीनैर्गुरुसंयुतैश्च ॥
दुर्गेश्वरःशत्रुमलंचवीर्यान्निर्जित्यराज्यंसुचिरंकरोति ॥ १३३ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर सिंहलग्न असून तें रवि, राहु, केतु, भौम, शनि यांवांचून गुरूशीं युक्त असेल तर ज्या राजाचा किल्ला आहे तो आपल्या पराक्रमानें शत्रूचें सैन्य जिंकून त्या किल्ल्याचें बहुत कालपर्यंत राज्य करील.

क्रूरग्रहोमूर्तिगतोहिदुर्गभंगोनहिस्याच्चबलीविशेषात् ॥
लग्नस्थितौराहुकुजौयदातुशत्रोस्तुभंगोनहिकेतुरीशः ॥ १३४ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर क्रूर ग्रह लग्नीं असेल, तर दुर्गभंग न होतां ज्याचा दुर्ग असेल तो विशेषेंकरून बलाढ्य होईल आणि प्रश्नलग्नीं जर राहु, मंगळ असतील तर शत्रूचा भंग होईल आणि लग्नीं जर केतु असला तर शत्रूचा भंग होणार नाहीं.

सितपुत्रोविशेषेणराहुर्वायदिलग्नगः ॥
शक्रेणापितदादुर्गभंगंकर्तुंनशक्यते ॥ १३५ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर बुध किंवा राहु लग्नीं असेल तर इंद्रानेंही दुर्गभंग करण्याविषयीं मनांत आणिलें असतां होणार नाहीं.

कितीं दिवसांनीं दुर्गभंग होईल अशाविषयीं.

लग्नाधिपेवीर्ययुतेबलाढ्येद्यूनाधिपेहीनबलेऽथवास्यात् ॥
तदाजयःस्यात्खलुयायिनांचखलांतरेलग्नग्रहस्यकालः॥१३६॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं लग्नेश बलाढ्य असून सप्तमेश हीनबल असेल तर शत्रूचा जय होईल. जर लग्नीं खलग्रह नसेल तर ज्याचा किल्ला आहे त्याचा जय होईल.

लग्नपापांतरांशानांयोगस्तत्समकैर्दिनैः ॥ ॥
मासैर्वर्गैस्तुदुर्गस्यजयस्तद्ग्रहणाद्भवेत् ॥ १३७ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं तात्कालिक लग्नाचें आणि पापग्रहाचें अंतर ह्मणजे एकमेकांची वजा-बाकी करून जितके अंश राहतील तितक्या अंक संख्येच्या दिवसांनीं किंवा महिन्यांनीं किंवा वर्षांनीं तो किल्ला अथवा कोट घेतल्याबद्दल प्रश्नकर्त्याचा जय होईल.

केंद्रादिसकलस्थानेस्थितेकेंद्रगतेविधौ ॥
अबलादुर्गगास्तत्रबाह्यस्थाःसकलाजनाः ॥ १३८ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं केंद्रांत शुभग्रह असून लग्नीं जर चंद्र असेल तर किल्लयावर सर्व बायकाच असून बाहेर सर्वच पुरुष आहेत असें जाणावें.

आजाऱ्याविषयीं.

तिथिवारभयामानांयोगादिःसंख्ययायुतः ॥
अष्टभिस्तुहरेद्भागंबाधाशेषेणसंवदेत् ॥ १३९ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं शुक्लप्रतिपदादि गततिथि, गतवार, गतनक्षत्रें, गतविष्कंभादि योग आणि गतप्रहर या सर्वांची संख्या एकत्र करून तिला आठांनीं भागून शेष उरलेल्या अंकावरून पुढें सांगितल्याप्रमाणें फलें जाणावीं.

हयाग्निर्देवताबाधापितृणांनेत्रदंतिभिः ॥
षट्चतुर्भूतबाधास्यान्नबाधाएकपंचयोः ॥ १४० ॥

**अर्थ.**—भागाकारांतीं शेषांक ७ किंवा तीन असे राहिले असतां देवतांची बाधा आहे असें समजावें. २।८ असे शेषांक राहिले तर पितरांची बाधा आहे असें सांगावें. ६।४ असे अंक उरले तर भूतबाधा आहे असें समजावें आणि १।५ असे उरले असतां बाधा नाहीं, शरीरभोग आहे असें जाणावें.

स्वरोगभवनेखेटःस्थितःसौम्यावलोकितः ॥
तदाशुभंविलोमेनमरणंनिश्चयाद्भवेत् ॥ १४१ ॥

**अर्थ.**—रोग्याविषयीं प्रश्न केला त्या वेळच्या लग्नीं षष्ठस्थानीं जर षष्ठाधीश असेल आणि त्याला शुभग्रहांनीं पाहिलें असेल तर त्या रोग्यास हा योग अशुभ आहे व तो त्या रोगा-पासून उलट खाऊन मरणार आहे असें जाणावें.

### वैद्याविषयीं

लग्नेक्रूरेवैद्यतोरोगवृद्धिःसौम्यैःसौख्यंशोभनंवैद्यतश्च ॥
ज्ञेयंतुर्येतद्वदेवौषधंचस्वर्क्षेरोगःस्वेच्छयायातिशांतिम्॥१४२॥

अर्थ.—प्रश्नकालीं जर लग्नीं क्रूरग्रह असून तें लग्नही क्रूर असेल तर ज्या वैद्याविषयीं प्रश्न केला असेल त्याचें औषध घेतलें असतां राग वाढेल आणि लग्न जर सौम्य असून सौम्य ग्रह तेथें असतील तर तो रोग बरा होऊन सुख होईल आणि त्या वैद्यासही यश मिळेल. याप्रमाणेंच चतुर्थ भावाविषयीं क्रूरसौम्याचा विचार करून औषधाविषयीं फल सांगावें आणि जर तो सुखेश किंवा लग्नेश स्वराशीस असेल तर तो रोग आपोआप शांति पावेल.

क्रूरःसप्तमगोलग्नादन्यरोगांतरंव्रजेत् ॥
पुनस्तत्रैवसौख्यंचशुभंवैद्यौषधंविना ॥ १४३ ॥

अर्थ.—जर प्रश्नकालीं लग्नापासून सप्तमभावीं क्रूर ग्रह असेल तर ज्या रोग्याविषयीं प्रश्न केला असेल तो रोगी दुसरा रोग पावेल आणि पुनः त्याच रोगापासून उत्तम वैद्याच्या औषधावांचून सुख पावेल.

### मला सौख्य केव्हां होईल अशाविषयीं.

मंदान्वितोरात्रिपतिर्व्ययस्थोदेवार्चितःषष्ठगतोवि-
लग्नात् ॥ सौख्यानिचार्थंप्रकरोतिशीघ्रंभूपात्त-
थामित्रजनाच्चदुष्टात् ॥ १४४ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं चंद्रमा जर शनीशीं युक्त असा व्ययभावीं असेल आणि बृहस्पति लग्नापासून षष्ठभावीं असेल तर प्रश्नकर्त्यास राजापासून, मित्रापासून आणि दुष्टापासूनही फार सुख होऊन अर्थप्राप्ति होईल.

### या गांवांत मी जातों परंतु मला फल होईल कीं काय अशाविषयीं.

धनाधिपोवायदिलग्नगश्चेद्धनस्थितोवादशमस्थितोवा ॥
तृतीयगेवानवमेदिनेशेकार्यंशुभंसिद्ध्यतिपृच्छकस्य॥ १४५ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं जर धनेश लग्नीं किंवा धनस्थानीं अथवा दशमभावीं असेल आणि तृतीय किंवा भाग्यभावीं सूर्य असेल तर प्रश्न करणारास नेमिलेल्या गांवांत योजिलेलें कार्य सिद्ध होईल आणि सुख होईल.

### तीर्थयात्रेविषयीं.

लग्नाधिपोलग्नगतोऽथधर्मस्वामीतनुस्थःशुभसंयुतोवा ॥
तदावदेत्प्रष्टुरभीप्सितंतौतेचेत्खलाढ्यौप्रतिबंधकौस्तः ॥१४६

अर्थ.—प्रश्नकालीं जर लग्नेश लग्नीं असेल आणि धर्मेशही लग्नीं असून शुभग्रहांशीं युक्त असेल तर त्या गांवांत प्रश्नकर्त्याचें इच्छित सिद्ध होईल असें सांगावें परंतु जर हे पूर्वोक्त लग्नधर्मेश, खल किंवा खलग्रहांनीं युक्त असतील तर त्या गांवांत प्रश्नकर्त्यास प्रतिबंध होईल असें समजावें.

### या वेळीं गुरुपाशीं विद्यारंभ करावा कीं काय अशाविषयीं.

जन्मभंप्रश्नतिथ्यर्क्षयुक्तंभक्तंरसैःफलं ॥
शून्येकशेषकेस्वर्गेपृथिव्यांद्वित्रिसंज्ञके ॥ १४७ ॥
पंचाब्धिशेषेपातालेयत्रातिष्ठतिवाक्पतिः ॥
तत्राध्ययनकर्तुश्चपूर्णाविद्याभवेद्ध्रुवं ॥ १४८ ॥

**अर्थ.**—ज्यानें प्रश्न केला असेल त्याचें जन्मनक्षत्र आणि ज्या वेळेस प्रश्न केला त्या ळच्या वर्तमानतिथि व नक्षत्रें हीं एकत्र करून त्या संख्येस सहांनीं भागून जो शेषांक उरेल त्यावरून बृहस्पति कोठें आहे हें पुढें सांगितल्यावरून जाणून विद्यारंभकालही पुढें सांगितल्याप्रमाणें सांगावा. आतां जर शून्य किंवा एक शेषांक उरेल तर बृहस्पति स्वर्गीं आहे असें जाणावें, जर दोन किंवा तीन शेष राहिले तर पृथ्वीवर आहे असें जाणावें, आणि पांच किंवा चार असे शेषांक उरले तर बृहस्पति पाताललोकीं आहे असें समजावें. ज्या मनुष्यास विद्या शिकावयाची त्यास ती विद्या पूर्णपणें यावी अशी इच्छा असल्यास त्यानें बृहस्पति मनुष्यलोकीं आहे अशा वेळा पाहून विद्येस आरंभ करावा. कारण, बृहस्पति जेथें आहे तेथें विद्यारंभ करणारास विद्या पूर्ण येते असा नियम आहे.

### नारदानें बाधा पाहण्यास सांगितल्याप्रमाणें धिविषयीं.

दिग्ग्रामयुक्तेतिथिवारयुक्तंतथायुतंअग्निभिरष्टभक्तं ॥
बाधानिवेद्याकरदंतिशेषस्यात्पैतृकीसप्तगुणैस्तुदैवी ॥ १४९ ॥

**अर्थ.**—भूमध्यरेषेच्या विभागाप्रमाणें प्रश्नकर्ता ज्या दिशेस असेल त्या दिशेस पूर्वादि अनुक्रमानें मोजावें आणि तो बाधेचा मनुष्य ज्या गांवीं राहत असेल त्या गांवाचे भावावरून त्याचें नक्षत्र आणि शुक्ल प्रतिपदेपासून वर्तमानतिथि हीं सर्व एकत्र करून त्यांत तीन मिळवून आठांनीं भागावें आणि भागाकारांतीं बाकी अंक राहतील त्यांवरून पुढें सांगितल्याप्रमाणें फलें जाणावीं. जर दोन किंवा आठ असे शेष राहिले तर पितरांची बाधा आहे असें सांगावें आणि सात किंवा तीन उरले असतां दैवी बाधा आहे असें सांगावें.

रसाब्धिशेषेखलुभूतबाधापंचैकशेषेभयमेवबाधा ॥ १५० ॥

**अर्थ.**—जर सहा किंवा चार शेष राहिले तर निश्चयानें भूतबाधा आहे असें सांगावें आणि पांच किंवा एक शेष उरला असतां भय वाटेल हीच बाधा म्हणजे शारीरिक पिडा असें जाणावें.

### व्रत घेण्याविषयीं.

लग्नाधिनाथःशुभखेटयुक्तोधर्मेशदृष्टोऽथहिधर्मसंस्थः ॥
मनोरथःपूर्णकरस्तदानींस्याद्वल्लभायाअथवल्लभस्य ॥ १५१ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं जर लग्नेश्वर शुभग्रहांशीं युक्त असून धर्मेशानें युक्त किंवा दृष्ट असेल तर तें व्रत करणाराचे मनोरथ त्याच्या यजमानापासून किंवा यजमानपत्नीपासून पूर्ण होतील.

अमुक स्त्रीशीं विवाह होईल किंवा नाहीं अशाविषयीं.

लग्नेतृतीयेयदिपंचमेवाकर्मायगोवायदिचंद्रमाःस्यात् ॥

शुक्रेणवाशक्रपुरोहितेनदृष्टस्तुलाभःखलुकन्यकायाः ॥१५२॥

अर्थ.—प्रश्नकालीं लग्न, तृतीय, पंचम, दशम आणि एकादश यांतून कोणत्याहि भावीं चंद्रमा असून तो शुक्र किंवा बृहस्पति यांनीं पाहिला असेल तर विवाह होईल.

पुत्राविषयीं.

लग्नपःपुत्रपश्चापिलग्नेस्यातामुभौयदि ॥

स्थितौद्रेष्काणकैकस्मिन्पुत्रप्राप्तिस्तदाभवेत् ॥ १५३ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं लग्नेश आणि पुत्रेश हे जर लग्नीं असतील अथवा एके द्रेष्काणांत असतील तर पुत्रप्राप्ति होईल असें सांगावें.

स्त्री गर्भिणी आहे किंवा काय अशाविषयीं.

गद्यं ॥ पंचमलाभोपगैःसौम्यैःस्त्रीगर्भिणीतिवाच्यं ॥ १५४ ॥

अर्थ.—प्रश्नलग्नीं पंचम आणि लाभ या दोन भावीं सौम्यग्रह असले तर स्त्री गरोदर आहे असें सांगावें.

स्त्री गर्भिणी आहे परंतु गर्भांत पुत्र किंवा कन्या आहे अशाविषयीं.

गद्यं ॥ जीवार्कशनिचंद्राश्चलग्नंविषमर्क्षेनरंकुर्युः ॥ १५५ ॥

अर्थ.—प्रश्न केला त्या वेळच्या लग्नकुंडलींत बृहस्पति, सूर्य, शनि, चंद्र हे विषम राशीस असतील आणि तात्कालिक लग्नही विषम असेल व तात्कालिक नक्षत्रही विषम असेल तर तो पुत्रगर्भ आहे असें सांगावें.

गर्भास किती महिने झाले आहेत अशाविषयीं.

गद्यं ॥ अथलग्नस्यांशैर्गतामासानिरूपिताः ॥ १५६ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं तात्कालिक लग्नाचे जितके भुक्तांश असतील त्यांवरून तारतम्यानें गर्भाचे भुक्त मास सांगावे.

गर्भिणी कधीं प्रसूत होईल अशाविषयीं.

भोग्यांशैर्भोग्यमासांश्चगर्भस्यकलयेदिनं ॥ १५७ ॥

अर्थ.–प्रश्नकालीन लग्नाचे भोग्यांशावरून तारतम्यानें गर्भिणी प्रसूत होण्याचा दिवस सांगावा.

दिनलग्नेभवेल्लग्नंलग्नेशोदिनराशिषु ॥

तदावाच्यंदिनेजन्मव्यत्ययेव्यत्ययंवदेत् ॥ १५८ ॥

अर्थ.—प्रश्नकालचें जर सिंहलग्न असून ती वेळही दिवसाचीच असेल तर पूर्वोक्त गद्यानुकूल दिवशीं दिवसां गर्भिणी प्रसूत होईल असें सांगावें.

समेलग्नेसमांशेचशनिःकन्याप्रदोभवेत् ॥

विषमेविषमांशेचलग्नेपुत्रप्रदोभवेत् ॥ १५९ ॥

**अर्थ.**—प्रश्नलग्नीं शनैश्वर जर समराशीस किंवा समांशीं असून तात्कालिक लग्नही समच असेल तर गर्भिणीस कन्या होईल असें सांगावें आणि तोच शनि जर विषमराशीस अथवा विषमांशीं असेल आणि लग्नही विषम असेल तर पुत्रजन्मच होईल असें जाणावें.

विषमांशेजीवसूर्यौपुत्रजन्मकरौमतौ ॥
समभांशेस्त्रियंकुर्युःशुक्रचंद्रधरासुताः ॥ १६० ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं बृहस्पति, आणि सूर्य हे जर विषमांशीं असतील तर पुत्रजन्मच होईल. शुक्र, चंद्र, भौम हे ग्रह समराशीस किंवा समांशीं असतील तर कन्या जन्मेल.

यस्मिन्गृहेशीतकरोविनष्टस्तस्मात्स्वउच्चेयदिवास्वगेहे ॥
यदाप्तगेहेचतदानिवेद्यआयातिचंद्रःखलुगर्भमोक्षः ॥ १६१ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं ज्या राशीस रवि आहे त्याच राशीस चंद्र आला असतां तो चंद्र आपल्या उच्चराशींत किंवा स्वक्षेत्रांत येतो. तर मित्रादि क्षेत्राचा विचार करून तारतम्यानें गर्भिणी प्रसूत होण्याची वेळ सांगावी. कारण, रवि ज्या राशीस आहे त्या राशीस मित्र, स्व, किंवा उच्चत्व अशा राशीस चंद्र आल्यावांचून गर्भमोक्ष होणार नाहीं.

देण्याघेण्याचे दुकानाविषयीं.

विलग्नचंद्राधिपतिःस्वमित्रेवक्रैश्चदृष्टौभवतश्चरिष्टौ ॥
द्यूनेतथाद्यूनपतिश्चमित्रदृष्टौशुभौग्राहकमानवस्य ॥ १६२ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं लग्नेश्वर आणि चंद्र ज्या राशीस असेल त्या राशीचा स्वामी हे आपल्या मित्रक्षेत्रांत असून त्याजवर वक्रग्रहाची दृष्टि नसेल आणि सप्तमेश सप्तमस्थानीं असून त्याला त्याच्या मित्रानें पाहिलें असेल तर प्रश्न करणारानें फक्त खरेदीचाच व्यापार केला असतां त्यास फायदा होईल.

राजदर्शनाविषयीं.

लग्नाधिपेनाथनिशाकरेणयदीत्थशालंकुरतेदिनेशः ॥
तदानरेंद्रस्यगृहेप्रयाणात्स्याद्दर्शनंलाभमथोहिमानः ॥१६३॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं सूर्य लग्नाधीश्वराबरोबर किंवा चंद्राशीं जर इत्थशालयोग करील तर प्रश्नकर्ता राजगृहीं गेला असतां त्याला राजदर्शन होऊन लाभ होईल व मानही मिळेल.

दुर्भिक्षाविषयीं.

केंद्रस्थितौराहुशनैश्चरौचेच्चतुर्थभावेथविशेषतोवा ॥
लग्नंतुशुद्धंयदितत्रवाच्यंदुर्भिक्षकंदैवविदासुनिश्चितं ॥ १६४ ॥

**अर्थ.**—प्रश्नकालीं केंद्रस्थानीं जर राहु आणि शनैश्वर असतील अथवा विशेषेंकरून चतुर्थस्थानीं असतील आणि लग्नीं कोणीच नसतील तर दुर्भिक्ष होईल असें सांगावें.

सुभिक्षाविषयीं.

बलयुक्तंविलग्नंचस्वामिनाशुभवीक्षितं ॥
अथवाशोशनाःकेंद्रेसुभिक्षंस्याच्चनिश्चितं ॥ १६५ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं लग्नेश शुभग्रह असून तो लग्नीं असेल, आणि त्याजवर शुभग्रहांची दृष्टि असेल किंवा शुभग्रह केंद्रीं असतील तर निश्चयानें सुभिक्ष होईल असें सांगावें.

पूर्वसंक्रांतिनक्षत्रात्परसंक्रांतिभंयदि ॥
द्वित्र्यक्षैसुमहर्घस्याच्चतुःपंचमहार्घता ॥ १६६ ॥

अर्थ.—प्रश्नकालच्या पूर्वीं रवि ज्या राशीस आला असेल, त्या दिवशींच्या नक्षत्रापुढें एक दोन नक्षत्रांत रवीच्या पुढच्या राशींस संक्रमण झालें असतां सुभिक्ष होईल आणि चार पांच नक्षत्रें अधिक असल्यास दुर्भिक्ष होईल असें सांगावें.

षष्ठेलोकाभ्रमंतीहगृहीत्वाखर्परंकरे ॥ १६७ ॥

अर्थ.—पूर्वोक्त प्रकारें जर पूर्वसंक्रांति नक्षत्रास सहा नक्षत्रांचें अंतर पडलें, तर सर्व लोक हातांत खापर घेऊन धान्य मागतील.

आषाढमासेयदिशुक्लपक्षेसोमस्यसूनोरुदयंकरोति ॥
शुक्रस्यचास्तंयदिश्रावणेस्यात्सुवर्णतुल्यंतुलितंचधान्यं॥१६८॥

अर्थ.—जर आषाढमासीं शुक्लपक्षीं बुधाचा उदय आणि श्रावण मासांत शुक्राचा अस्त होईल, तर त्या वर्षीं सोन्याप्रमाणें तोलून धान्य विकलें जाईल.

संक्रांतिधिष्ण्यंतिथिवारमिश्रंधान्याक्षरैर्वन्हिविभाजितंच ॥
रूपेसमर्घंद्वितयेसमंचशून्येमहर्घमुनयोवदंति ॥ १६९ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं रविसंक्रांति ज्या नक्षत्रीं झाली असेल, तें नक्षत्र व वर्तमान तिथि, वार, नक्षत्र हीं सर्व एकत्र करून ज्या धान्याविषयीं शोध करणें असेल त्याचीं नामाक्षरें पूर्वसंख्येंत मिळवून त्यास तिहीनीं भागून शेषांकावरून फल पहावें. जर एक शेष उरेल तर तें धान्य स्वस्तें होईल. दोन उरले असतां आहे तसेंच राहील आणि शून्य राहिलें तर तें धान्य महाग होईल.

### मुष्टीविषयीं.

वर्तुलंचंद्रभौमाभ्यांजीवेदीर्घंप्रकल्पितं ॥
चतुरस्रबुधेभानौशुक्रेचुन्नतमादिशेत् ॥ १७० ॥

अर्थ.—प्रश्नकालीं जर लग्नेश चंद्र किंवा भौम असेल तर वर्तुल पदार्थ आहे. बृहस्पति असेल तर लंबाकृति पदार्थ आहे आणि जर बुध किंवा रवि असेल तर चतुरस्र आहे व शुक्र असेल तर उंच पदार्थ आहे असें समजावें.

### नष्टवस्तूविषयीं.

चंदशुक्रेजलाधारेदेवतावसतौगुरौ ॥ रवौचतुष्प-
दस्थानेमिष्टान्नेस्याच्चवैबुधे ॥ दग्धस्थानेकुजेप्रो-
क्ताशनौभूमिबहिर्गता ॥ १७१ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं लग्नेश जर शुक्र किंवा चंद्र असेल तर वस्तु जलाशयाजवळ आहे; गुरु असेल तर देवघरांत आहे; रवि असेल तर गोठ्यांत आहे; बुध असेल तर स्वयंपाक-

शाळेंत आहे; मंगळ असेल तर जळलेल्या जागींच आहे आणि शनिलग्नेश असेल तर बहि-भूमीवर आहे असें जाणावें.

धातुज्ञानाविषयीं.

चंद्रेशुक्रेभवेद्रौप्यंबुधेस्वर्णमुदाहृतम् ॥
गुरौरत्नमयंहेमसूर्येमौक्तिकमुच्यते ॥
कुजेताम्रंशनौलोहंराहौमिश्रंप्रकाल्पतं ॥ १७२ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं लग्नेश चंद्र किंवा शुक्र असेल तर रुपें आहे; बुध असेल तर सोनें आहे; गुरु असेल तर जडाव आहे; सूर्य असेल तर मौक्तिक आहे; भौम असेल तर तांबें आहे. शनि असतां लोह आहे आणि राहु असतां मिश्रधातु आहे असें जाणावें.

वर्ण म्हणजे रंगाविषयीं.

गौरःशशीचंपकसन्निभश्चजीवोपिभानुश्चपिशंगवर्णः ॥
भृगुःशनिःकालरुचितमश्चकेतुश्चकर्पूरतरोहिवर्णः ॥
विज्ञाथवर्णान्प्रवदेत्सुनिश्चयंसनोपहासंव्रजतीहलोके ॥१७३॥

अर्थ.—चंद्र गोरा किंवा चांफ्यासारिखा आहे; बृहस्पति आणि सूर्य पिंगटवर्ण आहेत; शुक्र आणि शनि मेघासारखे आहेत आणि राहुही तसाच आहे व केतु कर्पूराप्रमाणें गोरा आहे, याप्रमाणें सर्व ग्रहांचा वर्णविचार करून असें उत्तर सांगावें कीं, जेणेंकरून सांगणार इहलोकीं थट्टेस पात्र होणार नाहीं.

शिकारीविषयीं.

द्यूनाधिनाथस्तनुनाथयुक्तोयदातदस्यान्मृगयोपलब्धिः ॥
स्यातांशुभौचंद्रगतौचयोगान्नातिर्वियोगात्खलुपृच्छकस्य१७४

अर्थ.—प्रश्नकालीं सप्तमेश जर लग्नेशाशीं युक्त असेल आणि चंद्राला शुभग्रहांचा योग असेल, तर शिकार साधेल. असा योग नसला तर शिकार साधणार नाहीं.

शिकारीस गेलों असतां किती श्वापदें मिळतील अशाविषयीं.

सूर्यर्क्षतोवाच्यमथोविधोच्चऋक्षाणिमध्ये
खलसंयुतानि ॥ तावन्मितैःप्राणिसमूहलाभः
शुभैस्तुयुक्तानिपलायनंस्यात् ॥ १७५ ॥

अर्थ.—प्रश्नकालीं सूर्य ज्या नक्षत्रीं असेल त्या नक्षत्रापासून चंद्र नक्षत्रापर्यंत मोजून जितकीं नक्षत्रें मध्यंतरीं येतील त्यांतून जितकीं पापग्रहयुक्त असतील तितक्या प्राण्यांचा लाभ होईल आणि जितकीं शुभग्रहयुक्त असतील तितके प्राणी पळून जातील.

योवासरोयश्चदिनेशएवनक्षत्रयुक्तःसहिवर्गितश्च ॥
भाप्तावशेषांकमितानितत्रामित्राण्यसत्त्वानिमहीपलाभे॥१७६॥

अर्थ.—ज्या वेळेस प्रश्न केला तो वार व त्याचा अधिपति ज्या नक्षत्रीं असेल, तें नक्षत्र

अशीं दोन्ही एकत्र करून त्या संख्येचा वर्ग करावा ह्मणजे त्या संख्येनें तीच संख्या गुणावी. आणि तिजला २७ नीं भागून जो शेषांक राहील तन्मित मित्र मिळतील तेही राजभेटीअंतीं निर्बल होणारे असे मिळतील.

### राशीचे बलज्ञानाविषयीं.

अधिपयुतोदृष्टोवाबुधगुरुणावानिरीक्षतश्चयोराशिः ॥
सभवतिबलवान्मदायुक्तोदृष्टोपिवाशेषैः ॥ १७७ ॥

**अर्थ.**—ज्या राशीचा जो स्वामी असेल त्यानें तो राशियुक्त किंवा दृष्ट असेल अथवा बुध किंवा गुरु यांनीं ज्या राशीस पूर्ण दृष्टीनें पाहिलें असेल आणि आधिपत्यावांचून शनीशीं युक्त नसेल व बुधगुरूंवांचून इतर ग्रहांनीं तो राशि दृष्ट नसेल, तर तोच राशि बलाढ्य आहे असें समजावें.

### बलाढ्य ग्रह कोणते हें ज्ञान होण्याविषयीं.

स्वोच्चस्वमित्रकोणस्थाःस्वकेगेहेचयेस्थिताः ॥
उदिताः सौम्यसंदृष्टाबलवंतस्तुतेग्रहाः ॥ १७८ ॥

**अर्थ.**—जे ग्रह आपल्या उच्च राशीस असतील व जे मित्रक्षेत्रांत असतील आणि जे कोण किंवा स्वगृह यांत असतील व जे उदय पावले असतील व ज्यांवर सौम्य ग्रहांची दृष्टि असेल, तेच ग्रह बलाढ्य जाणावे.

### क्षीणबल ग्रह कोणते हें समजण्याविषयीं.

नीचारिराशिगाःक्षीणाविनिष्टाःसौम्यदृष्टितः ॥
सूर्यतेजोहताश्चैवग्रहास्तेविबलाःस्मृताः ॥ १७९ ॥

**अर्थ.**—जे ग्रह आपल्या नीचांत अथवा शत्रुक्षेत्रांत असून क्षीण असतील आणि ज्यांवर शुभग्रहांची दृष्टि नसेल व जे अस्तंगत असतील, ते ग्रह हीनबल आहेत असें जाणावें.

## प्रश्नभैरव समाप्त.

---

### आतां अन्य ग्रंथमतांचें यात्रागत शुभाशुभ प्रश्नज्ञान समजण्याविषयीं.

जन्मलग्नंजन्मराशिस्तत्पतिःप्रश्नलग्नतः ॥
ततस्त्रयारिमध्यंस्यात्प्रश्नलग्नंतदाजयः ॥ १ ॥

**अर्थ.**—प्रश्न करणारानें जन्मलग्न आणि जन्मराशि यांचे स्वामी हे प्रश्नलग्नापासून ३, ६, १०, ११, या स्थानीं आले असतां किंवा ज्या वेळेस प्रश्न केला त्या वेळेचें लग्न जन्मलग्न, जन्मराशि व त्यांचे स्वामी यांपासून तिसरें, अकरावें, सहावें, दहावें, असें येईल तर प्रश्नकर्त्यास यात्रेपासून जय मिळेल.

### केंद्रादि राशींचे ज्ञानाविषयीं.

द्वारभाख्यंपणफरंराह्यराशिस्तुकेंद्रकम् ॥
आपोक्लिमंगर्भराशिर्मेषाज्ज्ञेयंविचक्षणैः ॥ २ ॥

अर्थ.—लग्नापासून दुसरें, पांचवें, आठवें, अकरावें, हीं पणफरस्थानें होत. यांना द्वारभ असें म्हणतात, आणि लग्न चतुर्थ, सप्तम, दशम हे बाह्यराशि; यांसच केंद्र ही संज्ञा आहे, आणि तिसरें, सहावें, नववें आणि बारावें यांस गर्भराशि अथवा आपोक्लिम स्थान असें म्हणतात.

### दिवसां व रात्रीं कोण बलाढ्य आणि कोण किती दोष नाश करितो हें समजण्याविषयीं.

दिवासूर्योनिशाचंद्रोलग्नाच्चैकादशोयदि ॥
दोषान्निहंत्याशुतुलराशीनिवयथाऽनलः ॥ ३ ॥

अर्थ.—दिवसास पाहिलेल्या मुहूर्तास आलेले सर्व दोष एकटा रवि लग्नीं बलाढ्य असतां नाशितो; त्याप्रमाणेंच रात्रीस चंद्रमा दोषनाशक आहे. रवि आणि चंद्रमा बलवान् असतील तर मोहरीयेवढा अग्नि जसा एका क्षणांत पर्वतायेवढा कापसाचा ढीग नाहींसा करतो, त्याप्रमाणें सर्व दोष जाळून टाकतील.

कुजोष्टगःषट्त्रिगतेभृगौचषडष्टगेऽरिःफगतेचचंद्रे ॥
दोषांश्चतान्कूलिकलग्नभवान्हिसर्वान्हरेत्त्रिषष्ठाय
गतोरविःसदा ॥ ४ ॥

अर्थ.—लग्नापासून अष्टमस्थानीं मंगळ, तृतीय किंवा षष्ठस्थानीं शुक्र आणि ६, ८, १०, या भावीं चंद्र असतां व ज्या दोषांस कुलिकादि नांवें आहेत ते एकविंशति महादोषादि सर्व दोष जर एकटा रवि लग्नापासून तिसरा, सहावा अथवा अकरावा असेल तर तो नाश करील.